# प्रकरण पाचवे

## गडहिंग्लज पंचायत समिती आणि कॉंग्रेस पक्षातील राजकारण

## प्रकरण पाचवे

## गडहिंग्लज पंचायत समिती आणि कॉंग्रेस पक्षातील राजकारण

भारतात प्राचीन काळापासून स्थानिक स्वराज्य संस्थांचे कोणत्या ना कोणत्या स्वरूपातील अस्तित्व आहे. प्राचीन भारतात व्यावसायिक श्रेणी, ग्रामपंचायत, जनपदसभा, ग्रामसंस्था अशा स्थानिक स्वराज्य संस्था होत्या. इ.स.पूर्व तिसऱ्या शतकातील मौर्यकाळात ग्रामसभा होत्या असा उल्लेख मिळतो. प्राचीन भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था प्रातिनिधिक स्वरूपाच्या नव्हत्या. त्या संस्थातील सभासद लोकांनी निवडून दिलेले नसत. गावातील प्रतिष्ठित, समाजसेवक, ज्ञानसंपन्न व अनुभवी लोकांना स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्थान मिळत असे. प्राचीन भारतातील अशा स्थानिक स्वराज्य संस्था जोपर्यंत स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था टिकून होत्या, तोपर्यंत अस्तित्वात राहिल्या. मोगल बादशहाच्या कारकिर्दीत स्थानिक स्वराज्य संस्थाकडे दुर्लक्ष झाले. त्यानंतर भारतात ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार सुरु झाल्यावर व्यापार व उद्योगधंद्यात वाढ झाली. आणि त्याबरोबर सत्तेचे केंद्रीकरण झाले. याकाळात पूर्वीची अर्थव्यवस्था नष्ट झाली. परिणामत: पूर्वीच्या स्वराज्य संस्थांचा ऱ्हास झाला. कालांतराने काही ब्रिटिश राज्यकर्त्यांना आपले साम्राज्य दीर्घकालपर्यंत टिकून धरण्यासाठी भारतात स्थानिक स्वराज्य संस्थांची आवश्यकता भासली. तसेच भारतीय लोकांना प्रातिनिधिक संस्थांचा अनुभव मिळाला पाहिजे असा विचार काही उदारमतवादी इंग्रजांनी मांडला. त्यामुळे भारतात स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करण्याचा विचार करण्यात आला. १६८७ मध्ये मद्रास येथे आणि १७२६ मध्ये मुंबई व कलकत्ता येथे महानगरपालिकांची स्थापना करण्यात आली. १८५० मध्ये शहरातून नगरपालिका आणि १८६० मध्ये ग्रामीण विभागासाठी जिल्हा लोकल बोर्ड स्थापन करण्यात आले.

१८७३ पासून स्थानिक संस्थामध्ये निर्वाचित प्रतिनिधींना स्थान देण्यात आले.

भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास ख-या अर्थाने लॉर्ड रिपनच्या काळात झाला. १८८२ मध्ये हिंदुस्थान सरकारचा ठराव मंजूर करण्यात आला. त्यात स्थानिक स्वराज्य संस्थांचे हेतू स्पष्ट करण्यात आले. भारतीय जनतेला संसदीय लोकशाहीचे शिक्षण देणे आणि लोकांना स्थानिक कारभारात सहभागी करुन घेणे हा स्थानिक स्वराज्य संस्थांचा हेतू होता. त्यानंतर १९१९ च्या सुधारणा कायद्यात स्थानिक स्वराज्य संस्थांचा पुन्हा विचार करण्यात आला. स्थानिक स्वराज्यसंस्थांवर लोकांचे नियंत्रण असावे आणि स्थानिक स्वराज्य संस्था इतर नियंत्रणापासून मुक्त असाव्यात अशी शिफारस करण्यात आली होती. १९१९ च्या सुधारणा कायद्याने प्रांतात द्विदल राज्यपध्दती सुरु करण्यात आली. त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी प्रांतीक सरकारवर सोपविण्यात आली होती. त्यानंतर १९३५ च्या कायद्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सरकारनियुक्त सभासदांचे अस्तित्व नष्ट करण्यात आले आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना लोकनियुक्त प्रातिनिधिक संस्था बनविण्यात आले. १९३५ ते १९४७ च्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांकडे विशेष लक्ष देण्यात आले नाही. कारण भारतीयांची संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी होती. १९४७ मध्ये स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांना लोकसत्ताक राज्यपध्दतीनुसार विशेष महत्व प्राप्त झाले. भारतीय राज्यघटनेच्या कलम ४० नुसार ग्रामपंचायतीचो स्थापना करण्याचा प्रयत्न सर्व राज्यांनी केला. प्रत्येक राज्याने सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे कायदे मंजूर करुन विशिष्ट प्रकारच्या स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन केल्या.

## जिल्हा लोकल बोर्डस्

१९२३ साली मुंबई लोकल बोर्ड कायद्यानुसार प्रत्येक जिल्हयाच्या

ठिकाणी एक लोकल बोर्ड स्थापन करण्यात आले होते. लोकल बोर्डाची निवडणूक प्रौढ मतदान पद्धतीने केली जात असे. त्यांच्या कामाची काल-मर्यादा चार वर्षांचा असे. जिल्हा लोकल बोर्डाच्या वर्षातून किमान चार सभा होत. जिल्हयातील सर्व ग्रामीण भाग बोर्डाच्या अधिकार क्षेत्रात येत असे. जिल्हा लोकल बोर्डाला सहाय्यक म्हणून काही तालुके मंडळे असत. जिल्हा लोकल बोर्डाची सदस्यसंख्या राज्यसरकारकडून निश्चित केली जाई.

जिल्ह्यातील एकंदर जमीन महसुलाच्या सुमारे १५ टक्के भाग त्यास विशिष्ट प्रमाणात गोळा करण्यात आलेला लोकल फंड, जंगलापासून मिळ-णाऱ्या उत्पन्नाचा २० टक्के भाग, रस्ते, वहाने यावरील कर, पाळीव जनावरांवरील कर उद्योगावरील कर इत्यादी मार्गांनी लोकल बोर्डाला उत्पन्न प्राप्त होत असे. कर्मचाऱ्यांच्या वेतनावर राज्याकडून अनुदान मिळत असे.

जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्षाला सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारणे, सभांचे नियोजन करणे, दैनंदिन कारभारावर देखरेख ठेवणे, बोर्डाचे हिशोब दप्तर यांची व्यवस्था पाहणे इत्यादी कामे पहावी लागत. स्थूलमानाने बोर्डाचे कार्यक्षेत्र आवश्यक व ऐच्छिक असे दोन प्रकारचे होते. आवश्यक कार्यात सार्वजनिक आरोग्य राखणे, सार्वजनिक विहीरी व तलाव यांची व्यवस्था पाहणे, साथीच्या रोगांचे नियंत्रण करणे, सार्वजनिक बांधकाम हाती घेणे, रस्ते दुरुस्ती, नद्यावर पूल बांधणे, प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करणे इत्यादी गोष्टींचा समावेश करण्यात आला होता. ऐच्छिक कार्यात शेतीविषयक सुधारणा, शेत-ऱ्यांना बी-बीयाणे व अवजारे पुरविणे, शेतीची आदर्श प्रयोग केंद्रे

उघडणे, दुष्काळी कामे हाती घेणे, करमणुकीची साधने क्रीडांगणे, उद्याने इत्यादींची व्यवस्था करणे इत्यादी बाबी येत असत. अलिकडे पंचायत राज्याच्या निर्मितीमुळे जिल्हा लोकल बोर्ड पद्धती विसर्जित करण्यात आली आहेत.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निर्मितीकडे राज्यकर्त्यांनी खास लक्ष पुरविले. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील महात्मा गांधींचे स्थान विचारात घेता, स्वातंत्र्योत्तर काळात देशाच्या राजकारणावर गांधीवादाचा प्रभाव पडणे अगदी स्वाभाविक होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाची अधिकारसूत्रे हाती घेतलेला कॉंग्रेस पक्ष गांधीवादी तत्वज्ञान प्रमाण मानणारा होता. गांधीवादी तत्वज्ञानामध्ये विकेंद्रीकरण व खेड्यांची स्वयंपूर्णता या गोष्टींना महत्वपूर्ण स्थान होते. खुद्द कॉंग्रेसनेही स्वातंत्र्यपूर्णता या गोष्टींना महत्वपूर्ण स्थान होते. खुद्द कॉंग्रेसनेही स्वातंत्र्यपूर्वकाळात पंचायत राज्याच्या कल्पनेवर बराच भर दिला होता. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासासाठी प्रयत्न करण्याचे नैतिक बंधन कॉंग्रेस पक्षावर होते. भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्येही ग्रामपंचायतीची स्थापना करुन त्यांना आवश्यक ते अधिकार देण्याचे उद्दिष्ट ठरवून देण्यात आलेले होते. त्यामुळे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाकडे सरकारने विशेष लक्ष देण्याचे ठरविले.

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने नियोजनबद्ध विकासाच्या मार्गाचा अंगिकार करण्याचे ठरविले आणि त्यासाठी पंचवार्षिक योजना आखण्यात आल्या. इ.स. १९५१ मध्ये पहिली पंचवार्षिक योजना सुरु करण्यात आली. पण पंचवार्षिक योजनांची यशस्वी वाटचाल ही सर्वस्वी

ग्रामीण विकासावर अवलंबून आहे. याची जाणीव भारतातील राज्यकर्त्यांना आणि विचारवंतांना झाली. तेव्हा पंचवार्षिक योजनेला गती देण्यासाठी आणि ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी १९५२ साली "सामुदायिक विकास योजना" ( Community Development Programme ) सुरू करण्यात आली. अर्थात सरकारने ग्रामीण विकासासाठी विकास योजना सुरू केली तरी या योजनेला अपेक्षित यश मात्र लाभले नाही. याचे महत्त्वाचे कारण असे होते की, या योजनेला ग्रामीण जनतेचे पुरेसे सहकार्य लाभले नाही. वास्तविक पाहता सामुदायिक विकास योजनेत जनतेच्या सहकार्याला अग्रक्रम देण्यात आला होता, परंतु प्रत्यक्षात ही योजना शासकीय पातळीपुरतीच मर्यादित राहिली. विकासाच्या कार्यक्रमांविषयी ग्रामीण जनतेत उत्साह निर्माण करणे आणि त्या कार्यक्रमात जनतेला सहभागी करून घेणे या गोष्टी सुरवातीच्या काळात साध्य करता आल्या नाहीत.

## बळवंतराय मेहता समितीच्या शिफारशी

समाज विकास योजनेला ग्रामीण जनतेचा मिळालेला अल्प प्रतिसाद विचारात घेऊन, जनतेचे वाढत्या प्रमाणावर सहकार्य मिळविण्यासाठी कोणती उपाययोजना करावी आणि त्या अनुषंगाने स्थानिक प्रशासन यंत्रणेची कोणत्या तत्त्वांवर पुनर्रचना करावी याचा अभ्यास करण्यासाठी सरकारने बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली इ.स. १९५७ मध्ये एक समिती नियुक्त केली. या समितीने २४ नोव्हेंबर, १९५७ रोजी आपला अहवाल सरकारला सादर केला.

बळवंतराय मेहता समितीने आपल्या अहवालात असे म्हटले आहे की, सामुदायिक विकास कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी, त्या कार्यक्रमाविषयी

स्थानिक जनतेच्या मनात आस्था निर्माण करण्याची आणि त्यामध्ये जनतेचा सहभाग वाढविण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे. समाजविकास कार्यक्रमांत नवा जोम, नवा उत्साह निर्माण करण्यासाठी आणि समाज विकास योजना जनतेची मोहीम बनविण्यासाठी विकासगटातील विकासाचा कार्यक्रम स्थानिक जनतेच्या प्रातिनिधिक स्वरूपाच्या लोकशाही संस्थेकडे सोपविला पाहिजे, त्याचप्रमाणे विकास कार्यक्रमाविषयीची ही नवी जबाबदारी त्या प्रातिनिधिक संस्थेला योग्य प्रकारे पार पाडता यावी यासाठी तिला पुरेसे द्रव्यबल व अधिकार उपलब्ध करून दिले पाहिजेत. जो-पर्यंत स्थानिक लोकांच्या इच्छेनुसार काम करणारी अशा प्रकारची प्राति-निधिक संस्था निर्माण केली जात नाही, तोपर्यंत स्थानिक लोकांचे विकास कार्यक्रमात उत्स्फूर्त सहकार्य मिळणार नाही आणि स्थानिक उपक्रमशीलतेला योग्य वावही मिळणार नाही.

मेहता समितीने ही वस्तुस्थिती विचारात घेऊन लोकशाहीच्या तत्वावर सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याची शिफारस केली. अशा प्रकारच्या लोकशाही विकेंद्रीकरणामुळे स्थानिक पातळीवर विकास कार्याची जबाबदारी स्वीकारण्यासाठी स्थानिक लोक स्वयंस्फूर्तीने पुढे येतील आणि त्यातून स्थानिक नेतृत्व उदयास येईल असा विश्वास मेहता समितीला वाटला होता. विकास कार्यक्रमांविषयी स्थानिक जनतेत असलेली उदासिनता आणि स्थानिक नेतृत्व निर्माण करण्याकडे झालेले दुर्लक्ष यात समाज विकास योजनेचे अपयश लपले असल्याने या कार्यक्रमात जनतेचा सहभाग वाढला आणि त्या संबंधीची जबाबदारी स्थानिक नेतृत्वाने उचलली तर समाज विकास योजनेचे उद्दिष्ट निश्चितच साध्य करता येईल असा अभिप्राय मेहता समितीने व्यक्त केला. [१] या समितीने "भारतातील ग्रामीण विभागातील विकासाच्या कार्याचे

विकेंद्रीकरण व्हावे व आर्थिक विकास व लोकशाही प्रगती व्हावी या दृष्टीने पंचायती राज्याची स्थापना केली जावी", अशी महत्वाची शिफारस केली. पंचायत राज्याच्या स्थापनेनंतर जिल्हा लोकल बोर्डाची आवश्यकता उरणार नाही असे समितीचे मत होते. लोकशाही विकेंद्रीकरण ( Democratic Decentralization ) प्रस्थापित व्हावे याकरिता या समितीने त्रिसूत्री ( three tier ) पंचरणेची शिफारस केली.

## पंचायत राज्याची त्रिसूत्री योजना

लोकशाही तत्वावर सत्तेचे विकेंद्रीकरण घडवून आणण्यासाठी मेहता समितीने पंचायत राज्याची त्रिसूत्री योजना मांडली. या त्रिसूत्री योजनेनुसार असे सुचविण्यात आले की, सर्वात खालच्या पातळीवर म्हणजे ग्रामपातळीवर ग्रामपंचायतीची स्थापना करण्यात यावी. विकासगटाच्या पातळीवर पंचायत समिती निर्माण करण्यात यावी आणि जिल्हा पातळीवर जिल्हा परिषदेची स्थापना करून तिच्यामार्फत कामात एकसूत्रता आणली जावी. अशा प्रकारे सत्तेच्या लोकशाही विकेंद्रीकरणावर आधारित असलेल्या शासनपध्दतीला "पंचायत राज्य" हे नामाभिधान प्राप्त झाले.

मेहता समितीने केलेल्या वरील शिफारशींना राष्ट्रीय विकास मंडळाच्या बैठकीत १२ जानेवारी, १९५८ रोजी मान्यता देण्यात आली. स्थानिक स्वराज्य शासनाच्या मध्यवर्ती मंडळानेही १९५९ साली लोकशाही विकेंद्रीकरणाला मान्यता दर्शविली. त्यानुसार भारत सरकारने लोकशाही विकेंद्रीकरणाच्या धोरणाचा पाठपुरावा करण्याचे ठरविले. भारत सरकारच्या या धोरणामुळे विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेला जोराची चालना मिळाली. भारतातील अनेक घटकराज्यांनी नवे कायदे करून किंवा प्रस्थापित कायद्यात सुधारणा करून लोकशाही विकेंद्रीकरणाच्या अंमलबजावणीला प्रारंभ केला. लोकशाही

विकेंद्रीकरणाचा हा प्रयोग इ.स. १९५९ मध्ये प्रथम राजस्थानात सुरु झाला. त्यानंतर आंध्र प्रदेश, ओरिसा, उत्तरप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र इत्यादी राज्यांनीही त्याचा स्वीकार केला. महाराष्ट्र सरकारने पंचायत राज्याची कशा प्रकारे अंमलबजावणी करता येईल यावर विचार करण्यासाठी श्री. वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली इ.स. १९६० मध्ये एक समिती नियुक्त केली. नाईक समितीने इ.स. १९६१ मध्ये आपला अहवाल राज्य सरकारला सादर केला.[२] १९६१ मध्ये महाराष्ट्र शासनाने पंचायत राज्य ही पध्दती तत्वत: मान्य केली व प्रत्यक्षात १ मे, १९६२ मध्ये महाराष्ट्र शासनाने १९२३ साली मुंबई लोकल बोर्ड कायद्याने स्थापन केलेली जिल्हा मंडळे, १९४८ च्या सेंट्रल प्रॉव्हीन्सेस अँड बेरार गव्हर्मेंट कायद्यानुसार स्थापन झालेल्या जनपद सभा व १९५५ च्या हैद्राबाद जिल्हा मंडळ कायद्यानुसार स्थापन झालेली जिल्हा बोर्डस् बरखास्त केली व पंचायत राज्याचा स्वीकार केला.

पंचायत राज्याच्या त्रिसूत्री योजनेनुसार विविध पातळ्यांवर ज्या स्थानिक संस्था स्थापन करण्यात आल्या त्यांचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

१) <u>पंचायत समिती</u>

विकास गटाच्या पातळीवर स्थापन करण्यात आलेल्या समितीला पंचायत समिती असे नाव दिले आहे. पंचायत समितीच्या सदस्यांची निवड ग्रामपंचायतींनी अप्रत्यक्ष निवडणुकीद्वारे करावी, त्याचप्रमाणे विकास गटाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या नगरपालिका आणि सहकारी संस्था यांना या समितीत प्रतिनिधित्व द्यावे अशी शिफारस मेहता समितीने केली होती. पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात शेती, पशुसंवर्धन, सार्वजनिक आरोग्य, प्राथमिक शिक्षण, समाजकल्याण, लघुउद्योग, सहकार इत्यादी विषय असावेत आणि

आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी पंचायत समितीला उत्पन्नाची निश्चित साधने उपलब्ध करुन द्यावीत अशीही शिफारस करण्यात आली होती. पंचायत समितीच्या उत्पन्नाच्या साधनांत जमीन महसुलातील वाटा, व्यवसाय कर, मालमत्तेवरील कर, यात्रा कर, सरकारी अनुदान इत्यादी बाबींचा समावेश होतो.

महाराष्ट्र राज्यातील पंचायत समितीची रचना खालीलप्रमाणे आहे.

१) विकासगटातील किंवा तालुक्यातील मतदार संघातून जिल्हा परिषदेवर निवडून आलेले सदस्य.

२) तालुक्यात वास्तव्य करीत असलेला जिल्हा परिषदेचा स्वीकृत सदस्य.

३) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या प्रत्येक मतदारसंघातून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडले गेलेले दोन सदस्य.

४) राज्य सरकारने निर्दिष्ट केलेल्या त्या तालुक्यातील शेतीमालाची खरेदी-विक्री करणाऱ्या सहकारी संस्थेचा अध्यक्ष हा सहयोगी सदस्य.

५) पंचायत समितीने निवडून घेतलेला त्या तालुक्यातील शेतीसंबंधी व्यवहार करणाऱ्या सहकारी संस्थेचा अध्यक्ष हा सहयोगी सदस्य.

६) पंचायत समितीच्या सदस्यांत स्त्री प्रतिनिधींचा समावेश नसेल तर त्या तालुक्यातील व्यक्तींमधून समितीने निवडून घेतलेली एक स्त्री ही स्वीकृत सदस्य.

७) पंचायत समितीच्या सदस्यात अनुसूचित जाती-जमातींच्या एकाही व्यक्तीचा समावेश नसेल तर त्या तालुक्यातील व्यक्तींमधून समितीने निवडून घेतलेला अनुसूचित जाती-जमातीचा प्रत्येकी एक प्रतिनिधी हे स्वीकृत सदस्य.

गट विकास अधिकारी हा पंचायत समितीचा पदसिध्द सचिव म्हणून काम पाहात असतो. तो पंचायत समितीचा मुख्य प्रशासक असतो आणि त्याची नियुक्ती राज्यसरकारकडून करण्यात येते.

लोकशाही विकेंद्रीकरणाच्या आपल्या योजनेत मेहता समितीने पंचायत समितीला अत्यंत महत्वपूर्ण स्थान दिले आहे.

२) जिल्हा परिषद

मेहता समितीने आपल्या अहवालात असे स्पष्ट केले होते की, विकास-गटाच्या पातळीवर पंचायत समितीची स्थापना करून तिच्याकडे सत्ता आणि अधिकार सुपूर्त केल्यानंतर जिल्हा पातळीवर काम करणाऱ्या जिल्हा लोकल बोर्डाची किंवा तत्सम सरकारी संस्थांची आवश्यकता उरणार नाही. त्याऐवजी जिल्हा पातळीवर "जिल्हा परिषद" नावाची समिती स्थापन करावी आणि त्या समितीकडे जिल्हयातील सर्व कामात सुसूत्रता आणण्याचे कार्य सोपवावे. मेहता समितीने असे सुचविले होते की, जिल्हा परिषदेत पंचायत समित्यांचे अध्यक्ष, लोकसभा व विधानसभा यांचे सदस्य आणि विकास खात्यात जिल्हा पातळीवर काम करणारे सर्व अधिकारी यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात यावा. तसेच जिल्हाधिकारी हा जिल्हा परिषदेचा अध्यक्ष असावा.

जिल्हा परिषदेच्या कार्यात पुढील गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आला होता.

१) जिल्ह्यातील पंचायत समित्यांची अंदाजपत्रके मंजूर करणे.
२) सरकारकडून आलेल्या पैशाची विकासगटांमध्ये विभागणी करणे.
३) पंचायत समितींना त्यांच्या कार्याबाबत मार्गदर्शन करणे.
४) विकासगटांच्या योजनांमध्ये एकसूत्रता आणणे. इत्यादी.

महाराष्ट्र राज्यातील जिल्हा परिषदांची रचना पुढीलप्रमाणे आहे.

१) साधारणत: ३५ हजार लोकसंख्येला एक या प्रमाणात कमीत कमी ४० व जास्तीत जास्त ६० इतक्या जिल्ह्यातील मतदारसंघांतून प्रौढ मताधिकाराच्या तत्वानुसार प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून आलेले सदस्य.

२) जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांचे सभापती हे पदसिध्द सदस्य.

३) निवडून आलेल्या सदस्यांत स्त्री प्रतिनिधींचा समावेश नसेल तर प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून आलेल्या सदस्यांनी निवडून घेतलेली एक स्त्री ही स्वीकृत सदस्य.

४) राज्य सरकारने निर्दिष्ट केलेल्या पाच सहकारी संस्थांचे अध्यक्ष, हे सहयोगी सदस्य. या पाच सहकारी संस्था म्हणजे - अ) पतपुरवठा, ब) भूविकास, क) खरेदी-विक्री, ड) औद्योगिक सहकार, इ) सहकारी प्रशिक्षण व शिक्षण या संबंधातील संस्था होत.

जिल्हा परिषदेच्या निवडून आलेल्या सदस्यांचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. निर्वाचित सदस्य आपल्यातून एक अध्यक्ष व एक उपाध्यक्ष यांची पाच वर्षांसाठी निवड करतात. तसेच विषय नियामक समित्यांचे सभापती हे देखील जिल्हा परिषदेचे पदाधिकारी म्हणून कार्य करतात. मुख्य कार्यकारी अधिकारी हा जिल्हा परिषदेचा मुख्य प्रशासक असतो. त्याची नियुक्ती राज्यसरकार करते. उपमुख्य कार्यकारी अधिकारी हा जिल्हा परिषदेचा सचिव म्हणून काम पाहातो.

३) ग्रामपंचायत

मेहता समितीने ग्रामपंचायतीबाबत अशी शिफारस केली होती की, ग्राम पातळीवर प्रौढ मताधिकाराच्या तत्वावर प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून गेलेल्या सदस्यांची ग्रामपंचायत स्थापन करावी. ग्रामपंचायतीमध्ये अनुसूचित जाती-जमातींचा प्रत्येकी एक प्रतिनिधी व दोन स्त्री सभासद स्वीकृत करण्याची तरतूद असावी. मेहता समितीने अशी ही शिफारस केली होती की, ग्रामपंचायतीचा उपयोग जमीन महसूल गोळा करणारी यंत्रणा म्हणून करण्यात यावा. तसेच पंचायत समितीकडे सोपविण्यात आलेल्या जमीन महसुलाच्या निव्वळ रकमेपैकी ७५ टक्के रक्कम ग्रामपंचायतींना देण्यात यावी.

महाराष्ट्रात ज्या गावाची लोकसंख्या ६०० पेक्षा जास्त आहे अशा गावांसाठी ग्रामपंचायतींची स्थापना करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. तथापि ज्या गावांची लोकसंख्या ६०० पेक्षा कमी असेल अशा दोन किंवा तीन खेड्यांची मिळून एक गट-ग्रामपंचायत स्थापन करण्यात येते. ग्रामपंचायतीत कमीत कमी ७ व जास्तीत जास्त १५ सभासद असतात. त्यांची निवड प्रौढ मताधिकाराच्या तत्वानुसार गावातील लोकांकडून ५ वर्षांच्या कालावधीसाठी केली जाते. सरपंच हा ग्रामपंचायतीचा प्रमुख पदाधिकारी असतो. त्याच्या मदतीसाठी एक उपसरपंचही असतो.

अशा पध्दतीने गाव, विकासगट आणि जिल्हा या स्तरांवर अनुक्रमे ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या संस्थांची स्थापना करणे ही पंचायत राज्याची त्रिसूत्री योजना आहे. भारतातील अनेक घटकराज्यांनी पंचायत राज्याची अंमलबजावणी केली आहे. अर्थात प्रत्येक घटक राज्याने

स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन मेहता समितीने सुचविलेल्या योजनेत आवश्यकतेनुसार काही फेरफार केले आहेत. तथापि लोकशाही तत्वावर सत्तेचे विकेंद्रीकरण हे मेहता समितीचे मुख्य सूत्र सर्वांनीच मान्य केले असून त्याद्वारे स्थानिक लोकांना प्रशासनाच्या कार्यात सहभागी करुन घेण्याचा आणि स्थानिक नेतृत्वाच्या निर्मितीला चालना देण्याचा प्रयत्न केला आहे. [३]

## श्री वसंतराव नाईक समितीचा अहवाल

बलवंतराय मेहता समितीने सुचविल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यात पंचायत राज्य सर्वांगीण बाबींचा विचार करण्यासाठी त्यावेळचे महाराष्ट्राचे महसूलमंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती २७ जून, १९६० रोजी नियुक्त करण्यात आली. या समितीने आपला अहवाल १५ मार्च, १९६१ रोजी सादर केला. सदर अहवालात एकूण २२६ शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ नुसार महाराष्ट्रात पंचायत राज्याची स्थापना करण्यात आली. हे अधिनियम बहुतांशी नाईक समितीच्या शिफारशींवरच आधारीत आहेत. नाईक समितीने अहवालात जिल्हा परिषदेला "जिल्हा कौन्सिल व पंचायत समितीला" गट समिती" असे संबोधले आहे. अधिनियमात जिल्हा परिषद व पंचायत समिती असा उल्लेख केलेला आहे. वसंतराव नाईक समितीने केलेल्या शिफारशी-पैकी वैशिष्टपूर्ण व महत्वाच्या शिफारशींचा आशय थोडक्यात खालील-प्रमाणे आहेत.

१) राज्य शासनाने स्थानिक कार्याबाबतच्या सर्व जबाबदाऱ्यांतून स्वत: मुक्त होऊन त्या जनतेच्या उपक्रमशीलतेवर आणि साधनसामुग्रीवर सोपवाव्यात.

२) नाईक समितीने ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद अशी त्रिस्तरीय व्यवस्था सुचविली असून त्यात जिल्हा स्तरावरील जिल्हा परिषद हा महत्वाचा व समर्थ घटक मानलेला आहे. पंचायत समितीला जिल्हा परिषद व ग्रामपंचायती यामधील महत्वाचा व प्रभावी दुवा मानलेला असून तिचा दर्जा जिल्हा परिषदेची कार्यकारी उपसमिती असा आहे. तिला जिल्हा परिषद व ग्रामपंचायतीप्रमाणे निगम निकाय (बॉडी कार्पोरेट) दर्जा असू नये.

३) या संस्थांची विशाल पायावर उभारणी, लोकांस प्रत्यक्ष जबाबदार राहणे व जरूर तेवढे राजकीय स्वरूप येण्यासाठी सर्व स्तरावर प्रत्यक्ष निवडणुकांचा पुरस्कार करण्यात यावा.

४) लोकसभा व विधानसभांच्या सदस्यांना जिल्हा परिषदेवर प्रतिनिधित्व असू नये.

५) जिल्हाधिकारी यांचा जिल्हा परिषदेच्या अंतर्गत कारभारात संबंध असू नये.

६) प्रशासनासाठी जिल्हाधिकारी दर्जाचा भारतीय प्रशासकीय सेवेतील स्वतंत्र अधिकारी जिल्हा परिषदेचा प्रशासकीय प्रमुख राहील व त्याला राज्यशासनाने परत बोलवावे असा राज्य शासनास बंधनकारक असणारा ठराव करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेस राहतील.

७) जिल्हा परिषदेचे कामकाज स्थायी समिती व सहा समित्यांमार्फत चालेल, यासाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष व दोन विषय समित्यांचे सभापती यांची निवड जिल्हा परिषदेवर निवडून आलेल्या सभासदांतूनच करण्यात येईल. परिणामकारक कार्य करता यावे म्हणून पदाधिकारी पूर्ण वेळ असतील व त्यांना मानधन निवास व अन्य सुविधा उपलब्ध राहतील.

तसेच विषय समित्यांच्या सभापतींना नियंत्रण, देखरेख, पाहणी व तपासणीचे अधिकार असतील. अध्यक्षांना मुख्य शासकावर नियंत्रण करण्याचे तसेच आणीबाणीच्या काळात काही खास अधिकार असतील. संबंधित खातेप्रमुख त्या त्या विषय समितीचे सचिव असतील.

८) स्थूलमानाने जिल्हा, तालुका विकास गट आणि खेडे या विविध पातळीवरील योजनांपैकी ज्या स्थानिक संस्थाकडून अधिक परिणामकारकपणे पार पाडल्या जातील आणि ज्याबद्दल त्या स्थानिक उपक्रमशीलता व सहभाग याकरवी उत्स्फूर्त विकास घडवून आणण्यास समर्थ होतील अशी वाजवी अपेक्षा बाळगता येईल. अशा सर्व योजनांचा स्थानिक क्षेत्रात निश्चितपणे समावेश करण्यात यावा. स्थानिक क्षेत्रातील सर्व कामांसाठी जिल्हा परिषद जबाबदारी असावी.[४]

पंचायत राज्य महाराष्ट्रात स्थापन करण्यात मा. यशवंतराव चव्हाण यांचा सिंहाचा वाटा होता. गावोगावचे प्रश्न दिल्लीत किंवा मुंबईत बसून सुटणार नाहीत, त्याबद्दल स्पष्ट कल्पनाही दिल्लीकरांना अथवा मुंबईकरांना येणार नाही. ते स्थानिक पातळीवरच सोडविले पाहिजेत, ही त्यामागील भूमिका होती. या कल्पनेच्या ओघात राजकीय व आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण होईल हे ही स्पष्ट होते. नियोजनाचे व शासनाचे प्रश्न स्थानिक पातळीवर सोडविताना जबाबदाऱ्या घेणाऱ्या अनेक व्यक्ती तयार होतील. स्थानिक नेतृत्व जिल्हा पातळीवर, राज्य पातळीवर फार काय राष्ट्र पातळीवरही उपयोगी ठरेल. हा सर्वात महत्वाचा फायदा अशा विकेंद्रीकरणापासून अपेक्षित होता. सत्तास्थाने गावोगावी निर्माण करून त्यांच्या मदतीने राष्ट्राचा कारभार चालविणे, म्हणजेच सत्तेचे विकेंद्रीकरण करून राष्ट्रभर निर्माण झालेल्या समर्थ नेतृत्वावर राष्ट्रगाडा चालविण्याची जबाबदारी देणे हे दुरान्वयाने का होईना, पण त्यामागचे मूलभूत तत्व होते.[५]

## महाराष्ट्र राज्याच्या पंचायत राज्याची वैशिष्टये

१) जिल्हा हा पंचायत राज्याचा प्रमुख मानला जातो. अन्य राज्यात तालुका ( Block ) प्रमुख मानण्यात आला आहे.

२) जिल्हा परिषदेची स्थापना व्यापक स्तरावर झाली आहे. व त्यात अनेक लोकांना प्रतिनिधित्व दिलेले आहे.

३) लोकसभेच्या किंवा विधान सभेच्या प्रतिनिधींना पंचायत राज्यात विशेष स्थान देण्यात आलेले नाही. त्यामुळे त्याच्या घटकांना बरीच स्वायत्तता प्राप्त झाली आहे. पंचायत राज्याच्या काही बाबतीतच जिल्हाधिका-याशी संबंध येत असतो.

## पंचायत राज्य व्यवस्थेत पंचायत समितीचे स्थान

विकासगटातील मतदारांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींची मिळून पंचायत समिती बनते. पंचायत समितीच्या काही जागा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि सर्व वर्गातील स्त्रिया यांच्यासाठी राखीव ठेवलेल्या असतात. स्त्रियांसाठी एक तृतीयांश जागा राखीव असतात. पंचायत समितीची मुदत पाच वर्षांची असते. सभापती व उपसभापती हे पंचायत समितीने मुख्य पदाधिकारी असतात. या दोघांची निवड पंचायत समितीतील निवडून आलेले सदस्य आपल्यामधून करतात. पंचायत समितीचा सभापती आपल्या कार्यक्षेत्रातील विकासाच्या सर्व कामांवर देखरेख करतो. गटविकास अधिकारी हा प्रशासन यंत्रणेचा प्रमुख असतो. त्याची नेमणूक सरकार करते.

आपल्या विकासगटातील लोकांच्या गरजा व मागण्या लक्षात विकासाची योजना तयार करण्याचे काम पंचायत समिती करते. आरोग्य,

शिक्षण, शेती सुधारणा योजनांची अंमलबजावणी, पशुसंवर्धन, सहकार, रस्तेदुरुस्ती, जलसिंचनाच्या सोई, पाझर तलावांच्या कामांना गती, हस्तोद्योग व कुटिरोद्योगांचा विकास इत्यादी विकासाची कामे पंचायत समितीला करावी लागतात. त्याचप्रमाणे समाजकल्याणाच्या वेगवेगळ्या योजनांची अंमलबजावणीही पंचायत समिती करते. जिल्हा परिषदेने सोपविलेली कामे देखील पंचायत समितीला करावी लागतात. जिल्हा परिषदेच्या योजना अंमलात आणणे व आवश्यक योजना सुचविणे ही कामे पंचायत समिती करते. ग्रामपंचायतीवर देखरेख ठेवणे हे सर्वात महत्वाचे काम पंचायत समितीस करावे लागते. जिल्हा परिषद आपल्या सर्वच कामांत पंचायत समितीवर अवलंबून असते. जिल्हा परिषदेचा कारभार ज्याप्रमाणे पंचायत समिती मार्फत चालतो, त्याचप्रमाणे पंचायत समितीचा कारभार ग्रामपंचायती मार्फत चालतो. अशाप्रकारे पंचायत समिती ही जिल्हा परिषद व ग्रामपंचायती यांच्यातील दुवा म्हणून कार्य करते. थोडक्यात म्हणजे पंचायत समिती ही एक महत्वाची संस्था आहे. पंचायत राज्य व्यवस्थेत पंचायत समितीला फार महत्वाचे स्थान आहे. [६]

## गडहिंग्लज पंचायत समिती – १९६२ ते १९६७

गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणात पंचायत समिती, ग्रामपंचायत व जिल्हा परिषदा इत्यादी संस्थांना फार महत्वाचे स्थान आहे. महाराष्ट्रात १ मे, १९६२ पासून पंचायत राज्य ही क्रांतिकारी योजना सुरु केली. यामुळे राज्यकारभारामध्ये प्रत्यक्ष भाग घेण्याची संधी अगदी शेवटच्या घटकाला प्राप्त झाली. म्हणजेच ग्रामपंचायतीचा, तालुक्याचा आणि त्याआधारे जिल्ह्याचा विकास साधण्यासाठी सत्तेचा, संपत्तीचे प्रत्यक्ष दान या योजनेत अंतर्गत आहे. शेकडो वर्षे अचेतन अवस्थेत पडून राहिलेल्या लोकशक्तीच्या

गाड्यास महाराष्ट्र सरकारने या पंचायत राज्याच्या अंमलबजावणीमुळेचा चालना दिली. सर्वसामान्य जनतेची संघटित शक्ती निर्विवाद लोक-कल्याणकारी ठरणारी आहे. लोकांच्या दाराशी प्रत्यक्ष लोकशाही भिडविणे म्हणजे सत्तेचे विकेंद्रीकरण होय. खरी लोकशाही निर्माण करण्यासाठी पंचायत राज्य हाच केवळ एकमेव मार्ग होता. पंचायत राज्याच्या प्रयोगातून स्थानिक पातळीवर विविध सत्तास्थाने निर्माण झाली. ती स्थानिक राजकारणात महत्वाची ठरली. ग्रामपंचायतीमधून त्या - त्या गावातील राजकीय नेतृत्व आकार घेऊ लागले. नवनव्या व्यक्ती राजकारणात सहभागी होऊ लागल्या.

पंचायत राज्य संस्थांच्या प्रस्थापनेमुळे स्थानिक नेतृत्वाला एक वेगळेच कार्यक्षेत्र मिळाले. सर्व लोकनियुक्त प्रतिनिधींना शासनानुभवाची व लोक-सेवेची संधी प्राप्त झाली. स्थानिक नेतृत्वाला व्यापक वाव दिला. ग्रामीण भागाच्या राजकारणावर या नव्या नेतृत्वाची जबरदस्त पकड असून त्या जोरा-वर राज्याच्या राजकारणावरही आपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न होऊ लागला. ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेत राजकीय जाणीव वाढू लागली. ऑगस्ट १९६२ मध्ये महाराष्ट्रात प्रथम पंचायत समिती निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकीत गडहिंग्लज पंचायत समितीमध्ये १० जागासाठी खालीलप्रमाणे उमेदवार निवडून आले.

गडहिंग्लज तालुका पंचायत समिती निवडणूक - सन १९६२ निकाल तक्ता

| अ.नं. | मतदार संघ | विजयी उमेदवाराचे नाव | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| १) | कडगांव | श्री. दौलत गोविंद पाटील | ३० |
| २) | कौलगे | " कृष्णराव बाळोजी देसाई | १८ |
| ३) | कसबा नूल | " हिंदुराव दिनकरराव शिंदे | २२ |
| ४) | हलकर्णी | " नारायण गंगाराम पाटील | ५२ |
| ५) | बसर्गे बुद्रुक | " संतराम गुंडू नौवकूडकर | २३ |
| ६) | भडगांव | " भिमराव दादू चव्हाण | २६ |
| ७) | नेसरी | " बसाप्पा चन्नाप्पा गुंजारी | ३८ |
| ८) | बटकणंगले | " विठू म-याप्पा देसाई | ३३ |
| ९) | हसूरचंपू | " शिवगोंडा शटगोंडा पाटील | बिनविरोध |
| १०) | महागांव | " शिवगोंडा आण्णासो पाटील | |

७

वरील ऑगस्ट, १९६२ च्या गडहिंग्लज तालुका पंचायत समिती निवडणुकीमध्ये कॉंग्रेस पक्षाला बहुमत मिळाले. कॉंग्रेसचे शिवगोंडा आण्णासो पाटील यांची गडहिंग्लज पंचायत समितीचे पहिले सभापती म्हणून निवड झाली.

गडहिंग्लज पंचायत समिती - १९६७ ते १९७२

सन १९६२ साली गडहिंग्लज पंचायत समितीची स्थापना झाल्यानंतर झालेल्या निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाने पंचायत समितीत सत्ता प्रस्थापित केली. पंचायत समितीच्या माध्यमातून गडहिंग्लज तालुक्याच्या विकासाची अनेकविध

विकास कामे करण्यात येऊ लागली. या विकास कामामध्ये शेतीची सुधारणा व उत्पादन वाढ, सुधारलेल्या अवजारांचा व साहित्याचा वापर भाजीपाला व फळे यांचे उत्पादन वाढविणे, खेड्यांतील जनावरांचे दवाखाने, औषधोपचार केंद्रे, गुरांचे प्रदर्शन भरविणे, मागासलेल्या वर्गाचा आर्थिक विकास, प्राथमिक शाळांच्या इमारती बांधणे, ग्रामीण औषधोपचार केंद्रे याचा समावेश होता.

सन १९६२ ते १९६४ या कालावधीमध्ये श्री. शिवगोंडा आण्णासो पाटील यांनी गडहिंग्लज पंचायत समितीचे सभापती म्हणून काम पाहिले. अनंत मुकुंद तेलवेकर यांची सन १९६४ मध्ये दुसरे सभापती म्हणून निवड झाली. त्यांनी सन १९६७ पर्यंत सभापती म्हणून काम पाहिले. ऑगस्ट, १९६७ मध्ये गडहिंग्लज पंचायत समितीची दुसरी निवडणूक झाली. या निवडणुकीमध्ये खालीलप्रमाणे उमेदवार विजयी झाले.

गडहिंग्लज पंचायत समिती निवडणूक सन १९६७

| अ.नं. | मतदार संघ | | विजयी उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| १) | कडगांव | श्री. | कृष्णराव बाळोजी देसाई |
| | | " | शंकर गोविंद शिपूरकर |
| २) | नूल-हसूरचंपू | " | सातगोंडा रूद्रगोंडा पाटील |
| | | " | बसगोंडा लिंगोंडा पाटील |
| ३) | हलकर्णी-वसर्गे बुद्रुक | " | राजकुमार शंकरराव हत्तरकी |
| | | " | रावसाहेब रामगोंडा पाटील |
| ४) | महागांव - भडगांव | " | इश्वरा शिवाप्पा गोरूले |
| | | " | बाळगोंडा भिमगोंडा पाटील |
| ५) | नेसरी - बटकणंगले | " | तुकाराम शंकर पाटील |
| | | " | मल्लाप्पा दुंडाप्पा हुक्केरी |

सन १९६७ साली झालेल्या गडहिंग्लज पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये कॉंग्रेस पक्षाने बहुमत मिळवून सत्ता प्रस्थापित केली. सन १९६७ साली सातगोंडा रुद्रगोंडा पाटील यांची सभापती म्हणून निवड झाली.

गडहिंग्लज पंचायत समिती - सन १९७२ ते १९७९

सन १९७२ ते १९७९ या काळात गडहिंग्लज पंचायत समितीने विविध विकास कामे केली आणि तालुक्याच्या विकासासाठी प्रयत्न केले. त्यामध्ये रस्ते बांधणी, व्यवस्था व दुरुस्ती, ग्रामीण रस्त्यावर पूल व फरशा बांधणे, रस्त्यावरील झाडांची व्यवस्था, प्रसूतिगृहे व बालसंगोपन, ग्रामीण आरोग्य व्यवस्था, ग्रामीण पाणीपुरवठा, ग्रामीण भागातील गटारांची व्यवस्था, ग्रामीण उद्योगधंद्यांना प्रोत्साहन, प्रौढ शिक्षणवर्ग, किसान मेळे, ग्रंथालये व वाचनालये, शिबीरे, यात्रा व प्रदर्शने, ग्रामीण घरबांधणी, ग्रामीण विभागाचा आर्थिक विकास, वृक्षारोपण, पंच-सरपंच शिबीरे, ग्रामीण सुधारणा, बालवाडया चालविणे, महिला विकास, गरीब कुटुंब विकास अशी अनेक विकास कामे करून गडहिंग्लज तालुक्याच्या विकासासाठी हातभार लावला. दारिद्र्य रेषेखालील लोकांचे जीवनमान उंचावणे, बँका-मार्फत कर्जपुरवठा, शेतीविकास, बायोगॅस, फळबाग योजना, ठिबक सिंचन योजना अशा योजनांसाठी शासकिय अनुदान दिले.

ऑगस्ट, १९७२ मध्ये गडहिंग्लज पंचायत समितीची निवडणूक झाली. या निवडणुकीतही कॉंग्रेस पक्षाने पंचायत समितीमध्ये सत्ता प्राप्त केली. या निवडणुकीमध्ये एकूण १५ जागांपैकी कॉंग्रेसला १० जागा मिळाल्याने कॉंग्रेस पक्षास निर्विवाद बहुमत प्राप्त झाले. या निवडणुकीत पंचायत

समिती सभापती सतीश पाटील हे विजयी झाले. बाळगोंडा पाटील यांनी १९६७ ते १९७७ या काळात दहा वर्षे सभापती म्हणून काम पाहिले. त्यांच्यानंतर जून, १९७७ मध्ये राजकुमार शंकरराव हत्तरकी यांची सभापती म्हणून निवड झाली. सन १९७२ च्या पंचायत समिती निवडणुकीत विरोधकांनी ५ जागा जिंकल्या. नेसरी व कडगांव गटात शेतकरी कामगार पक्ष व बंडखोर उमेदवार निवडून आले होते.[१] राजकुमार हत्तरगी यांनी सन १९७७ ते १९७९ या काळात सभापती म्हणून काम पाहिले. राजकुमार हत्तरकी यांची सभापती कारकिर्द अतिशय यशस्वी ठरली. त्यांच्या कारकिर्दीत अनेक विकास कामांना गती मिळाली.

गडहिंग्लज पंचायत समिती - सन १९७९ च्या निवडणुका

सन १९७९ साली शरद पवार यांच्या "पुलोद" सरकारने जिल्हा-परिषदांच्या निवडणुका मे महिन्यात घेतल्या. या निवडणुकांद्वारा जिल्हा परिषदा ताब्यात घेऊन ग्रामीण महाराष्ट्रात आपला पाया भक्कम करण्याचा त्यांचा विचार होता. त्यावेळी समांतर काँग्रेसतर्फे निवडणुका लढविण्यात आल्या. शरद पवारांनी बैलाच्या चित्रावर निवडणुका लढविल्या. या निवडणुकीस पूर्वी नव्हते एवढे महत्व प्राप्त झाले होते. नव्या पक्षोपक्षांची, गटांची राजकीय सत्तास्पर्धा आणि त्यासाठी पायाभूत शक्ती संघटित करण्याची झालेली निकड असे दुहेरी स्वरुप होते. जिल्हा परिषदेतील पक्षाबल हाच वरिष्ठ स्तरावरील राजकारणाचा पाया असल्याने तिथे आपली मजबूत करणे हा एकमेव पर्याय होता. तेव्हा तो येनकेन प्रकारेण साध्य करण्यासाठी युत्या, सहयोग, समझोते, हातमिळवण्या वगैरे विविध मार्ग धुंडाळण्यात आले.

गडहिंग्लज तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती या यांच्या निवडणुकीत जिल्हा परिषदेचे पाच मतदार संघात तिरंगी आणि तीन मतदार संघात दुरंगी लढत झाली. या तालुक्यात आय कॉंग्रेस आणि तिडके कॉंग्रेस यांच्यात समझोता झाला नाही. नेसरी बटकणंगले जिल्हा परिषद मतदार संघात दोन्हीही कॉंग्रेसचे उमेदवार नव्हते. तेथे समवते कॉंग्रेसचे जिल्हा अध्यक्ष बाबा कुपेकर विरूद्ध जनता पक्षाचे दिपकराव शिंदे यांच्यात सरळ लढत झाली. उभय बाजूने ही निवडणूक मोठया जिद्दीने लढविण्यात आली. "पुलोद"मधील समवते कॉंग्रेस, शेतकरी कामगार पक्ष आणि जनता पक्ष यांच्याशी समझोता झाला नाही. पण शेतकरी कामगार पक्ष आणि जनता पक्षाचे जमले होते. काही स्वतंत्र उमेदवार वाघ सिंहाचे चिन्ह घेऊन उभे राहिले होते. हे वाघ-सिंह कितपत टिकतात हा प्रश्नच होता.[१०] या तालुक्यात गडहिंग्लज साखर कारखान्याच्या निमित्ताने जे नेतृत्व पुढे आले होते. तीच मंडळी या निवडणूक रिंगणात होती. कॉंग्रेसचे गडहिंग्लज साखर कारखान्याचे अध्यक्ष आप्पासाहेब नलवडे, बाबा कुपेकर हे समांतर कॉंग्रेसमध्ये सामील झाले होते. जनता पक्षाचे उमेदवार सुध्दा जिद्दीने उभे होते. गडहिंग्लज तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाचे भाई तुकाराम कोलेकर, भाई धोंडिराम पताडे ही मंडळी त्यांचे उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रयत्न केले. श्री. धोंडिराम पताडे यांना गडहिंग्लज सहकारी साखर कारखान्यामध्ये संचालक मंडळात संधी मिळाली होती. त्यामुळे शेतकरी कामगार पक्षाला चांगले दिवस होते. खासदार दाजीबा देसाई, डी.एस. नार्वेकर, हिंदुराव साळोखे ही मातब्बर मंडळी शेकाप पक्ष बळकट करण्यासाठी प्रयत्न करीत होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शेकापने जाणीवपूर्वक काम केले होते. त्यामुळे दिपकराव शिंदे - नसरीकर यांच्या उमेदवारीने बाबा कुपेकर मतदार संघात घनघोर लढत झाली.[११]

कोल्हापूर जिल्हा परिषदेत पुलोद आघाडी किंवा स्वर्णसिंग काँग्रेस यापैकी कोणालाही बहुमत मिळाले नाही. समांतर काँग्रेस आणि स्वर्णसिंग काँग्रेस यांच्यात तोडीस तोड रस्सीखेच झाली. जिल्हा परिषदेच्या ५७ जागांपैकी समांतर काँग्रेसला २२ आणि स्वर्णसिंग काँग्रेसला २२ जागा मिळाल्या. याशिवाय जनता पक्ष २, इंदिरा काँग्रेस ३, शे. का.प. १ आणि स्वतंत्र ७ उमेदवार विजयी झाले.

पंचायत समिती निवडणुकीमध्ये ११४ जागापैकी यड्रावचे प्रकाश बाळगोंडा पाटील हे बिनविरोध निवडून आले. राहिलेल्या ११३ जागापैकी १११ जागांचे निकाल जाहीर झाले. त्यापैकी समांतर काँग्रेसला ३५ आणि स्वर्णसिंग काँग्रेसला ४० जागा मिळाल्या. इतर जनता पक्ष ६, इंदिरा काँग्रेस ६, शे.का.प. ५, आणि स्वतंत्र १८ असे बलाबल होते. [१२]

## गडहिंग्लज तालुका जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक

निकाल - सन १९७९

### निवडणूक निकाल तक्ता

| अ.नं. | मतदार संघाचे नाव | उमेदवाराचे नाव | पक्षाचे नांव | चिन्ह |
|---|---|---|---|---|
| | **जिल्हा परिषद** | | | |
| १) | कडगाव-कौलगे | नागाप्पा गुरुलिंगाप्पा बटकडली | स्वर्णसिंग कॉंग्रेस | गायवासरु |
| २) | नूल-हसूरचंपू | शिवमूर्ती साताप्पा कांबळे | कॉंग्रेस(आय) | हात |
| ३) | महागांव-भडगांव | शिवाजीराव उर्फ शिवगोंडा रामगोंडा पाटील | -"- | हात |
| ४) | हलकर्णी-बसर्गे | राजकुमार शंकरराव हत्तरकी | -"- | हात |
| ५) | नेसरी-बटकणंगले | बाबासाहेब कुपेकर | समांतर कॉंग्रेस | बैल |
| ६) | | | | |
| | **पंचायत समिती** | | | |
| १) | कडगाव | रामगोंडा गोपाळ पाटील | स्वर्णसिंग कॉंग्रेस | गायवासरु |
| २) | कौलगे | बाबासाहेब निगोंडा पाटील | कॉंग्रेस(आय) | हात |
| ३) | नूल | बसगोंडा निगोंडा पाटील | -"- | हात |
| ४) | हसूरचंपू | आप्पासाहेब भिमगोंडा पाटील | -"- | हात |
| ५) | हलकर्णी | बाबासाहेब आप्पासाहेब पाटील | -"- | हात |
| ६) | बसर्गे | आण्णाप्पा संतराम मणिकेरी | समांतर कॉंग्रेस | बैल |
| ७) | महागांव | विरगोंडा आण्णासाहेब पाटील | कॉंग्रेस(आय) | हात |
| ८) | भडगांव | ईश्वर शिवाजी गोरूले | स्वर्णसिंग कॉंग्रेस | गायवासरु |
| ९) | नेसरी | कृष्णा राणबा वाईंडे | शेकाप | खटारा |
| १०) | बटकणंगले | मा.जो. शिंगटे | समांतर कॉंग्रेस | बैल |

सन १९७९ साली झालेली जिल्हा परिषद निवडणूक अत्यंत अटीतटीची झाली. कोल्हापूर जिल्हा परिषदेत स्वर्णसिंग काँग्रेस आणि समांतर काँग्रेस यांची जवळपास बरोबरीने लढत झाली. मात्र गडहिंग्लज पंचायत समितीवरील आपली सत्ता काँग्रेस (आय) पक्षाने आपल्याकडे ठेवण्यात यश मिळविले. तालुक्यातील पंचायत समितीच्या १० जागांपैकी काँग्रेस (आय) पक्षाने ५ जागा मिळविल्या. याशिवाय जिल्हा परिषदेच्या एकूण ५ जागांपैकी ३ जागा काँग्रेस (आय) पक्षाने संपादन केल्या. त्यामुळे गडहिंग्लज पंचायत समितीच्या एकूण १५ सभासदांमध्ये काँग्रेस (आय) पक्षाचे ८ सभासद झाल्यामुळे सन १९७९ च्या निवडणुकीमध्ये पंचायत समितीत काँग्रेस (आय) पक्षाने बहुमत मिळविले. इतर ७ सभासदांमध्ये स्वर्णसिंग काँग्रेस ३, समांतर काँग्रेस ३ आणि शे.का.प. १ असे बलाबल झाले होते. [१४] या निवडणुकीत काँग्रेस (आय) पक्षाने सत्ता प्रस्थापित केल्यामुळे काँग्रेस (आय) चे हलकर्णी मतदार संघातून निवडून आलेले बाबासाहेब आप्पासाहेब पाटील यांची पंचायत समिती सभापती म्हणून निवड करण्यात आली. त्यांनी जून १९७९ ते जानेवारी, ८२ पर्यंत सभापती म्हणून कामकाज पाहिले. त्याच्यानंतर आप्पासाहेब भिमगोंडा पाटील यांची सभापती म्हणून निवड झाली. त्यांनी जून, १९८२ ते जून, १९९० अखेर सभापतीपद भूषविले.

## सन १९७९ नंतरचे काँग्रेसमधील राजकारण

काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून गडहिंग्लज तालुक्याची ओळख होती. सन १९७९ साली गडहिंग्लज तालुक्यात जिल्हा परिषद निवडणूक ही काँग्रेसच्या तीन गटात झाली. स्वर्णसिंग काँग्रेस, समांतर काँग्रेस आणि इंदिरा काँग्रेस या काँग्रेस अंतर्गत तीन पक्षांमार्फत निवडणूक लढविली गेली. या निवडणुकीत राजकुमार हत्तरकी, आप्पासाहेब तलवडे, नागाप्पाण्णा

बटकडली व बाबा कुपेकर यांनी आपापल्या गटांचा प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न केला. काँग्रेस पक्षांतर्गत गटबाजीमुळे काँग्रेसचा हा बालेकिल्ला ढासळू लागला. वेगाने पडझड सुरू झाली. प्रभावी नेतृत्वाअभावी काँग्रेस पक्षाची पूर्ण वाताहात सुरू झाली. १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत डॉ. शिवलिंग याळी यांचा पराभव झाला. त्यावेळेपासून काँग्रेस पक्षाला उतरती कळा लागली. १९८५ साली पुलोद म्हणून बाबा कुपेकर यांनी जनता दलाचे श्रीपतराव शिंदे यांना मदत करून निवडून आणले. एवढेच नव्हे तर शरद पवारही श्रीपतराव शिंदे यांच्या प्रचारासाठी येऊन गेले. त्याचवेळी तालुका संघातही आघाडी करून निवडणूक जिंकली. पुलोदच्या सहकार्याने विरोधकांनी नगरपालिकाही जिंकली. काँग्रेसच्या दयनीय अवस्थेचे विश्लेषण करताना लक्षात घेणे आहे. मध्यंतरी सन १९८८ मध्ये साखर कारखाना निवडणूक झाली. केवळ आप्पासाहेब नलवडे यांना हटविण्यासाठी काँग्रेसचे सर्व गट आणि जनता दलाची मंडळी एकत्र आली आणि कारखाना जिंकला.

फेब्रुवारी, १९९० मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीने तर काँग्रेस पक्षाची आणखी छकले केली. उमेदवारी बाबा कुपेकर यांना मिळाली. त्यामुळे काँग्रेस (आय) चे राजकुमार हत्तरकी यांनी सर्व शक्ती पणाला लावून बाबा कुपेकर यांना पराभूत केले आणि जनता दलाचे आमदार श्रीपतराव शिंदे यांना विजयी करण्याचे श्रेय आपल्या खात्यावर नोंदवून घेतले. राजकुमार हत्तरकींच्या निर्णयाने काँग्रेस पक्ष आणखी खिळखिळा झाला. ग्रामीण भागातील जनता काँग्रेसच्या पाठीशी होती. मात्र नेतृत्वाअभावी कार्यकर्ते भरकटत चालले होते. सर्व गटांना एकत्र करून पक्षाची पुनर्बांधणी आवश्यक होती. परंतु तेवढ्या कुवतीचा एकही नेता नव्हता, ही वस्तुस्थिती होती. स्थानिक पातळीवर अनेक गट आणि त्यांचे नेते एकमेकावर कुरघोडी करण्यात मग्न होते. आपल्या वर्तणुकीने काँग्रेस पक्षाची वाताहात होत आहे याचा

विचार करायला कुणी तयार नव्हता. तालुका काँग्रेसचे अध्यक्ष बसगोंडा पाटील आणि इतर पदाधिकारी केवळ कागदोपत्री होते. काँग्रेस अंतर्गत गटबाजी संपुष्टात आणण्याची कुवत त्याच्यात नाही. या परिस्थितीत गटबाजी आणखी तीव्र होऊन तालुका काँग्रेस पक्ष अधिकच दुर्बल होईल असे राजकीय निरीक्षकाचे मत होते. अशाप्रकारे एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून परिचित असलेला हा तालुका काँग्रेसच्या दृष्टीने इतिहास जमा होत होता. या किल्ल्यास गटबाजीची खिंडारे पडली होती. जवळजवळ एक तपानंतर होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीबाबत ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांत उत्साह निर्माण झाला होता.

सन १९९० ते १९९२ या काळात दोन वर्षे पंचायत समितीवर प्रशासकीय राजवट होती. गावपातळीवरच्या कार्यकर्त्यांना गावच्या पिण्याचा पाण्याचा, रस्त्याचा, शाळेचा, वैद्यकिय सेवेचा असे प्रश्न पंचायत समितीत लोकप्रतिनिधी-मार्फत मांडता येतात. त्यामुळे काही कार्यकर्त्यांत उत्साह होता. ग्रामपंचायत पातळीवर कार्यकर्त्यांचे अनेक नवे चेहरे दिसत होते. बहुसंख्य ठिकाणी पदवीधर मंडळी सरपंच म्हणून काम करीत होती. जवाहर रोजगार, एकात्मिक ग्रामीण विकास योजनांची प्रभावीपणे कार्यवाही करून या तरुण सरपंचानी गावचा चेहरामोहरा बदलून टाकला होता. ही नवीन मंडळी तिकिटासाठी इच्छुक होती. काँग्रेस पक्षात इच्छुकांची संख्या मोठी होती. कोणालाही उमेदवारी मिळाली तरी सर्वच मतदार संघात बंडखोरी अटळ होती. [१५]

## गडहिंग्लज तालुका काँग्रेस पक्षांतर्गत गटबाजी आणि जनता दलाचे राजकारण

जिल्हा परिषद निवडणुकी संदर्भात गडहिंग्लज तालुक्याचा विचार करता सन १९७९ साली जिल्हा परिषद निवडणुकीच्या वेळी विधानसभेवर

काँग्रेस (आय) पक्षाचा प्रतिनिधी होता. १९८५ च्या निवडणुकीत मात्र जनता पक्षाचा प्रतिनिधी काँग्रेस (आय) उमेदवाराचा पराभव करून निवडून आला. गडहिंग्लज तालुका काँग्रेस (आय) चा बालेकिल्ला समजला जात होता. छोट्या मोठ्या संस्था काँग्रेस (आय) पक्षाकडे होत्या. पंचायत समिती सभागृहात विरोधी शेतकरी कामगार पक्षाचा एकमेव सदस्य होता. दोन वर्षाची प्रशासकीय राजवट वगळता सन १९६२ पासून गडहिंग्लज पंचायत समितीवर काँग्रेस पक्षाचीच सत्ता आहे. मात्र अनेक गटांमुळे काँग्रेस पक्षात कुणाचा कुणाला मेळ दिसत नाही. पंचायत समितीचे १० वर्षे सभापती असलेले आप्पासाहेब पाटील, तालुका काँग्रेस अध्यक्ष बसगोंडा पाटील आणि जिल्हा परिषद अर्थ खात्याचे माजी सभापती राजकुमार हत्तरकी यांचा गट यांची तोंडे परस्परविरोधी आहेत. त्यामुळे बंडखोरी अटळ होती. तालुका संघ, कृषि उत्पन्न बाजार समिती, जिल्हा बँक प्रतिनिधी या सर्वच ठिकाणी काँग्रेस (आय) सत्ता होती. काँग्रेस (आय) पक्षाची अशी भक्कम स्थिती असतानाही काँग्रेस पक्ष गटबाजीने पोखरलेला होता.[१६] डॉ. शिवलिंग घाळी यांच्या निधनानंतर तालुका काँग्रेस (आय) पोरकी झाली. तब्बल दहा-बारा वर्षे डॉ. घाळी यांचे एकमुखी नेतृत्व लाभले होते. छोटे मोठे कार्यकर्ते त्यांच्या पाठिंब्यावर कोणतेही धाडस करीत असत. त्यांच्या निधनानंतर मात्र सर्वच कार्यकर्ते मोठ्या गोंधळात सापडल्यासारखे दिसतात. तालुक्यात सर्व समावेशक नेतृत्व राहिलेले नाही. नेतृत्व कोणाचे मानायचे ? हाच प्रश्न काँग्रेस कार्यकर्त्यांना भेडसावीत होता. पंचायत समितीचे सभापती आप्पासाहेब पाटील यांनी सुमारे १० वर्षे सभापतीपद यशस्वीपणे सांभाळले. आता मात्र त्यांचेच सहकारी त्यांना विरोध करीत होते. "पोरकट" नेतृत्व म्हणून हिणवत होते. तालुका काँग्रेस (आय) चे अध्यक्ष बसगोंडा पाटील यांच्याकडे नेतृत्वाचे गुण आहेत. त्यांचा स्वभावही सर्वांना बरोबर नेणारा आहे. तथापि त्यांचा बहुतेक वेळ हिरण्यकेशी साखर कारखान्याकडे जातो. पावल्या वेळात

ते गडहिंग्लजला असतात. त्यांचेही तालुक्यातील संघटना वा अन्य प्रश्नांकडे लक्ष नाही असे आरोप करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या अर्थ खात्याचे माजी सभापती राजकुमार हत्तरकी यांना मानणारा गट आहे. बाबा कुपेकर कोल्हापूर मुक्कामी असतात. तालुक्याशी त्यांचा संपर्क नाही. एकंदरीत गडहिंग्लज तालुक्यातील कॉंग्रेस (आय) पक्षात पूर्वी कधीही नव्हता असा गोंधळ निर्माण झाला होता. [१७] निवडणूक आली म्हणजेच तालुका कॉंग्रेस (आय) अध्यक्षांची आठवण कार्यकर्त्यांना व्हायची आणि अध्यक्षांनाही आपण एका महत्वाच्या पदावर आहोत याची जाणीव व्हायची. एक-दोन नव्हे तर तब्बल १५ वर्षे याच पध्दतीने तालुका कॉंग्रेसचा कारभार चालला. मात्र या कार्यपध्दतीनेच कॉंग्रेस (आय) पक्षाचा बालेकिल्ला ढासळू लागला. गटबाजीने कहर केला होता. गटबाजीमुळेच १९८५ ते १९९० च्या विधानसभा निवडणुकीत या मतदार संघात कॉंग्रेस (आय) पक्षाला पराभव पत्करावा लागला ही वस्तुस्थिती आहे. तालुक्यात कॉंग्रेस (आय) मध्ये आज चार-पाच वेगळे गट आहेत. या सर्वांना एकत्र आणून पक्ष संघटना बळकट करण्याची कुवत असलेला सर्व समावेशक नेता नाही, ही गोष्ट कॉंग्रेस (आय) कार्यकर्ते मान्य करतात. गटबाजीने पोखरलेल्या पक्ष संघटनेची डागडुजी करताना अनेक प्रश्न निर्माण होतात. सर्व गटांना स्थान देऊनच तालुका कॉंग्रेस (आय) ची पुनर्रचना होणे गरजेचे होते. स्थानिक पातळीवर गटबाजीचा प्रश्न गंभीर असतो. [१८]

गडहिंग्लज तालुका कॉंग्रेस (आय) एकेकाळी रत्नाप्पा कुंभार यांच्या गटाचे नेतृत्व मानत होती. डॉ. घाळी यांनी मात्र रत्नाप्पा कुंभार गटाशी संबंध तोडून खासदार उदयसिंगराव गायकवाड गटाशी जवळीक केली. सन १९७९ च्या जिल्हा परिषद निवडणुकीनंतर डॉ. घाळी गटाकडील निर्णायक मतामुळेच जिल्हा परिषदेची सूत्रे खासदार गटाकडे राहिली होती. राजकुमार

हत्तरकी यांना दोन वर्षे जिल्हा परिषदेत शिक्षण आणि अर्थ खात्याचे सभापतीपद मिळाले होते. नेतृत्व कुणाचे मानावे या प्रश्नावर तालुका काँग्रेस (आय) मध्ये फूट पडली. सभापती आप्पासाहेब पाटील, तालुका काँग्रेस (आय) चे अध्यक्ष बसगोंडा पाटील या मंडळीचा रत्नाप्पा कुंभार गटाकडे ओढा, तर रत्नाप्पा गटाशी सोयरीक करणे राजकुमार हत्तरकी, डॉ. घाळी यांना मंजूर नव्हते. या रस्सी खेचीतूनच जिल्हा दूध संघाच्या निवडणुकीत राजकुमार हत्तरकी गटाने जनता पक्ष आणि बाबा कुपेकर गटाशी आघाडी केली. आणि निवडणूक जिंकली. रत्नाप्पा गटाचे माजी आमदार बी.एस. पाटील कोल्हापूर मुक्कामी राहून फावल्या वेळात तालुक्याचे राजकारण करीत. [१९]

गडहिंग्लज तालुका काँग्रेस (आय) मध्ये सर्वांना सामावून नेणारे नेतृत्व नाही. त्यामुळे प्रत्येकाने आपलेच घोडे दामटण्याचे धोरण अवलंबिले होते. या पार्श्वभूमीवर होत असलेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुका म्हणजे काँग्रेस (आय) पक्षापुढे मोठे आव्हान होते. उमेदवार निवडीपासूनच अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागणार होते. पंचायत समिती सभापती आप्पा-साहेब पाटील, तालुका काँग्रेस (आय) अध्यक्ष बसगोंडा पाटील आणि राजकुमार हत्तरकी गट यांची तोंडे परस्परविरोधी होती. काँग्रेसमधील विविध गटात जर समझोता झाला नाही, तर निवडणुकीत बंडखोरी अटळ होती. ज्येष्ठ नेते नागाप्पाण्णा बटकडली आणि काँग्रेस (एस) मधून आलेले बाबा कुपेकर यांची भूमिकाही महत्वाची होती. अनेक गटांमुळे काँग्रेस पक्षात कुणाचा कुणाला मेळ दिसत नाही. ग्रामपंचायत निवडणुकीत काँग्रेस पक्षाची सरशी झाली होती. काँग्रेस (आय) पक्षाला अनुकूल वातावरण होते. सर्व गटांना एकत्र आणून उमेदवारांची निवड होण्यावरच या पक्षाचे भवितव्य अवलंबून होते. गडहिंग्लज तालुका प्रथमपासून काँग्रेस (आय) पक्षाचा

बालेकिल्ला आहे. सर्व संस्था कॉंग्रेस पक्षाच्या नियंत्रणाखाली होत्या. अशा अवस्थेत माणसांतील मतभेद संघटनेला मारक ठरतात हे दुर्दैव होय.

तालुक्यातील विरोधी पक्षीयांचा विचार करताना प्रामुख्याने जनता पक्षाचा करावा लागतो. आज पंचायत समिती अथवा जिल्हा परिषदेत या पक्षाचा एकही सभासद नाही. मात्र पक्ष म्हणून सर्वखेडयांत पोहचलेला कार्यकर्त्यांचा संच असलेला हा एकमेव विरोधी पक्ष होता. विधान-सभा निवडणुकीत बाबा कुपेकर यांच्यासह विरोधी पक्ष होता. विधानसभा निवडणुकीत बाबा कुपेकर यांच्यासह सर्वच विरोधी पक्षांनी आघाडी तयार करून कॉंग्रेस (आय) उमेदवाराचा पराभव केला. सत्तारूढ कॉंग्रेस (आय) च्या विरोधात असंतुष्ट कॉंग्रेस (आय) गटासह जर एखादी आघाडी निर्माण झाली तरच तालुक्याचे चित्र बदलणे शक्य होते, याची जाणीव ठेवूनच जनता पक्षाचे आमदार श्रीपतराव शिंदे यांनी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी आघाडी करण्याचे प्रयत्न चालविले.[२०] जनता पक्षाने कॉंग्रेस (आय) मधील अंतर्गत गटबाजीचा वेळोवेळी अचूक फायदा उठविला. श्रीपतराव शिंदे यांच्या कुशल नेतृत्वामुळे कॉंग्रेस (आय) पक्षातील मतभेदाचा लाभ उठवित गडहिंग्लज तालुका राजकारणात जनता पक्ष हा प्रभावी बनला. दोन वेळा आमदारपद, नगर-पालिकेत सत्तांतर, साखर कारखाना ही तालुका राजकारणातील शक्तीस्थाने प्राप्त करण्यात जनता पक्षाने यश मिळविले होते. जनतेच्या प्रश्नावर सतत चळवळी करून जनता दलाने आपली चांगली प्रतिमा जनमाणसात निर्माण केली होती.

## गडहिंग्लज पंचायत समिती निवडणूक - सन १९९२

विधानसभा निवडणुकीत गटबाजीतून निर्माण झालेली कॉंग्रेस पक्षाची "जैसे थे" अवस्थेत असल्याने आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक म्हणजे कॉंग्रेस पक्षापुढील मोठे आव्हान होते. या आव्हानाला

सामोरे जाण्यासाठी कॉंग्रेस (आय) पक्षाने मोर्चेबांधणी सुरु केली होती. तरी त्याला कितपत यश मिळणारयाबाबत कॉंग्रेस नेतेच साशंक होते. विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेस (आय) चे एक नेते राजकुमार हत्तरकी यांना उमेदवारी नाकारली गेली म्हणून बंड करुन जनता दलाच्या उमेदवारास सहकार्य करुन निवडून आणण्यात आले. हत्तरकी गटाची ही आक्रमक चाल तालुका कॉंग्रेसला खिळखिळी करुन टाकणारी ठरली. विधानसभा निवडणुकीनंतरही सर्व गटांना एकत्र आणण्याचा कुणी प्रयत्न केला नाही. तशी कुवत असलेला एकही नेता नाही. जिल्हा कॉंग्रेसचे नेते अथवा या भागातून निवडून गेलेले खासदार उदयसिंगराव गायकवाड यांनीही या प्रश्न लक्ष घातलेले नाही. त्यामुळे तालुका कॉंग्रेस (आय) आणि हत्तरकी गट यांच्यातील दरी रुंदावत गेली. तालुका कॉंग्रेसच्या पुनर्रचनेत हत्तरगी गटाला पूर्ण डावलण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर होणाऱ्या जिल्हा परिषद आणि तालुका पंचायत निवडणुका कॉंग्रेस पक्षाला आव्हानात्मक ठरणार होत्या. हत्तरकी गटाचे आव्हानच कॉंग्रेसला महागात पडणार होते.

गडहिंग्लज तालुक्यातून आतापर्यंत सर्वच्या सर्व पाचही मतदारसंघातून जिल्हा परिषदेवर कॉंग्रेसचेच उमेदवार निवडून गेले होते. पंचायत समितीतही कॉंग्रेस पक्षाशिवाय कोणीच निवडून गेले नव्हते. अपवाद फक्त कृष्णराव वाईंडे यांचा होता. शेकापच्या तिकिटावर ते गेल्यावेळी पंचायत समितीवर निवडून गेले होते. गेल्या २५ वर्षात पंचायत समितीवर कॉंग्रेस पक्षाचा झेंडा फडकत होता. ती अवस्था यावेळी कायम राहण्यासाठी मोठी धडपड करावी लागणार होती. शासनाच्या नवीन निर्णयानुसार तालुक्यातील जिल्हा परिषदेचे दोन मतदारसंघ महिलासाठी राखीव करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या स्थापनेपासून निवडून जाणारे कॉंग्रेसचे नेते नागाप्पा बटकडली आणि महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे सरचिटणीस म्हणून निवड झालेले

ज्येष्ठ नेते बाबा कुपेकर यांचा असे दोन मतदार संघ (कडगाव आणि नेसरी) महिलांसाठी राखीव झाले होते. काँग्रेस पुनर्रचनेत पंचायत समितीचे माजी सभापती यांना तालुका काँग्रेसचे अध्यक्षपद देण्यात आले होते. ज्येष्ठ नेते बाबा कुपेकर, माजी तालुका अध्यक्ष बसगोंडा पाटील, नागाप्पाण्णा बटकडली अशा नेतेमंडळींची साथ त्यांना असली तरी हत्तरकी गटाचे आव्हान ते कसे पेलणार हा खरा प्रश्न होता.[२१]

फेब्रुवारी, १९९२ मध्ये जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती निवडणुका घेण्याचे शासनाने जाहीर केले. या घोषणेमुळे ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांत एक वेगळाच उत्साह संचारल्याचे चित्र दिसते. तब्बल १२ वर्षानंतर या निवडणूका होत होत्या. हे एक प्रमुख कारण होते. हत्तरकी आणि कुराडे हे दोन गट वगळता सर्व मंडळी काँग्रेस पक्ष म्हणून एकत्र आली होती. त्या गटाची भूमिका अद्याप स्पष्ट नव्हती, तरीसुद्धा कुपेकरांचे नेतृत्व मानण्याची त्यांची तयारी नव्हती. तालुक्यातील सहा जिल्हा परिषद मतदार संघापैकी बाबा कुपेकर आणि नागाप्पाणा बटकडली या दोन ज्येष्ठ नेत्यांचे मतदार संघ राखीव झाले होते. त्याशिवाय महागाव, हसूरचंपू, बसर्गे, तेरणी हे चार पंचायत समिती मतदार संघ महिला राखीव होते. अनुसूचित जातीसाठी जिल्हा परिषदेचा नूल मतदार संघ आणि मुत्नाळ हा पंचायत समिती मतदार संघ राखीव होता. जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत कुपेकर यांच्या विरोधात एक प्रबळ आघाडी पुन्हा एकदा आकारास आल्याचे दिसते. तिकीट वाटपात पक्षश्रेष्ठींनी गटबाजी कायम ठेवली होती. मिळेल तिथे अधिकृत उमेदवारी नाही तर बंडखोरी याच सूत्राचा अवलंब काँग्रेस-मधील सर्व गटांनी केल्याचे ठळक चित्र पाहायला मिळते. निवडणूक रिंगणात विविध गट आणि पक्षांचे उमेदवार उभे असले तरी प्रामुख्याने कुपेकर विरुद्ध सर्व असेच चित्र स्पष्ट झाले होते. यातून कोण बाजी मारणार हा प्रश्न

होता. तिकीट वाटपातील पहिल्या टप्प्यात सरचिटणीस पदावर असतानाही कुपेकर यांच्या विरोधकांनी बाजी मारली होती.

गडहिंग्लज तालुक्यातील ६ जिल्हा परिषद आणि १२ पंचायत समिती मतदार संघातील कडगांव मतदार संघात सौ. क्रांती किसनराव कुराडे, महागांव पंचायत समिती मतदार संघात माधुरी अजितसिंह देसाई आणि बसर्गे मतदार संघात मंगला तात्यासाहेब पाटील या तीन महिला उमेदवार बिनविरोध निवडून आल्या. या सर्व कुपेकर विरोधी गटाच्या होत्या. हत्तरकी गट, जनता दल, कुराडे गट अशीच आघाडी झाल्याचे या तीन उमेदवारांच्या निवडीने स्पष्ट झाले होते. जनता दलानेही आपले उमेदवार मागे घेतले हे लक्षात घेण्यासारखे होते. कुपेकरांना एकाकी पाडण्याचा हा प्रयत्न होता.

नेसरी मतदार संघात बाबा कुपेकरांचे बंधू भैय्या कुपेकर यांच्या पत्नी वंदनादेवींना उमेदवारी मिळाली असली तरी शोभादेवी शिंदे-नेसरीकर या बंडखोर उमेदवार होत्या. त्यांना राजकुमार हत्तरकी यांची साथ होती. याउलट हलकर्णी मतदार संघातून राजकुमार हत्तरकी बिनविरोध निवडून येण्याच्या स्थितीत असताना कुपेकर यांनी गुरुलिंग नजनावर यांची उमेदवारी ठेवून संधी काढून घेतली होती. हसूरचंपू मतदारसंघात माजी सभापती आप्पासाहेब पाटील यांची उमेदवारी अपेक्षित होती. ज्येष्ठ नेते बाबा कुपेकर यांचे त्यासाठी प्रयत्न होते. तथापि पालकमंत्री दिग्विजय खानविलकर यांच्या आग्रहाने दत्ताजी नलवडे यांना उमेदवारी मिळाली. दत्ताजीराव नलवडे यांचे बंधू गडहिंग्लज साखर कारखान्याचे संस्थापक आप्पासाहेब नलवडे होत. या मतदार संघातून मलगोंडा पाटील यांनी काँग्रेस (आय) मधून बंडखोरी केली होती. हत्तरकी गटाचे समर्थक म्हणून मलगोंडा पाटील यांचे नाव चर्चेत होते.

जनता दलाने बाबूराव गुरबे (बटकणंगले), बी.टी. पाटील (कौलगे)

विनोद नायकवाडी (नूल), कृष्णा पाटील (हलकर्णी), भारती पवार (हसूरचंपू) या मतदार संघात उमेदवार उभे केले होते. तर शेतकरी कामगार पक्षाने धोंडिराम पताडे (महागाव), कृष्णराव वाईंगडे (नेसरी) तुळजाराम देसाई (बटकणंगले), दीपांजली पेडणेकर (नेसरी) असे चार उमेदवार उभे केले होते.

ज्येष्ठ नेते नागाप्पा बटकडली यांच्या विरोधात ॲड. विकास पाटील उभे होते. त्यांना कुपेकर विरोधी सर्व गटांचा पाठिंबा होता. चित्री प्रकल्प मंजूरीनंतर तालुक्यात कॉंग्रेसला अनुकूल हवा होती. त्यावेळी नगरपालिका, भूविकास बँक, बाजार समिती, साखर कारखाना या निवडणुकासलग जिंकून कुपेकर यांनी आघाडी घेतली होती. यावेळी मात्र त्यांची अवस्था विचित्र झाली होती.[२२] या निवडणुकीत मात्र त्यांच्या नेतृत्वालाच जबर आव्हान देण्यात आले होते. त्यांचे प्रतिस्पर्धी राजकुमार हत्तरकी यांनी पध्दतशीर व्यूहरचना करुन कुपेकर यांची कोंडी केल्याचे चित्र दिसते. हत्तरकी गटाचा हा पवित्रा लक्षात घेऊन कुपेकर गटानेही प्रतिशह म्हणून हत्तरकी गटाच्या सर्व उमेदवारांच्या विरोधी बंडखोर उमेदवार उभे केले होते. प्रमुख दोन नेत्यांतील ही लढाई निर्णायक होऊन तालुक्याचे नेतृत्व कुणाकडे ? याचे उत्तर देणारी निवडणूक म्हणून या निवडणुकीस वेगळेच महत्व होते.

बाबा कुपेकर यांची कोंडी करण्यासाठी राजकुमार हत्तरकी गटाने जनता दलाचे आमदार श्रीपतराव शिंदे गटाशी अलिखित समझोता केला आहे ही गोष्ट स्पष्ट होती. कॉंग्रेस (आय) मधील विविध गट आणि जनता दल अशा एकत्रित आघाडीशी कुपेकर गटाची झुंज होती. कुपेकर यांच्या विरोधात ही आघाडी आताच झाली अशातला भाग नाही. दीड वर्षापूर्वी विधानसभा निवडणुकीत याच आघाडीने कुपेकर यांचा

पराभव केला होता. कुपेकर यांच्या प्रगतीचा घोडा रोखण्याची संधी काँग्रेस अंतर्गत गटबाजीमुळे काँग्रेसमधील विविध गटांना या निवडणुकीत मिळाली होती. काँग्रेस (आय) मधील गडहिंग्लज तालुक्यातील गटबाजीचे ठळक चित्र असे होते.[२३]

गडहिंग्लज पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या एकूण १८ पैकी १५ जागांसाठी दि. २५ फेब्रुवारी, १९९२ रोजी मतदान झाले. जिल्हा परिषदेची एक व पंचायत समितीच्या दोन अशा तीन जागावर काँग्रेस (आय) चे बाबा कुपेकर विरोधी गटाचे उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. जिल्हा परिषदेच्या ५ जागासाठी १३ आणि पंचायत समिती-च्या १० जागासाठी २७ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. काँग्रेस (आय) तर्फे सर्व जागा लढविल्या गेल्या. तर ३ जिल्हा परिषद आणि ५ पंचायत समिती मतदार संघात काँग्रेस बंडखोरांनी सामना दिला. जनता दलाने ६ पंचायत समिती व २ जिल्हा परिषद मतदार संघात निवडणूक लढविली. तर शेकापने १ जिल्हा परिषद आणि ३ पंचायत समिती मतदार संघात निवडणूक लढविली. असे असले तरी, खरी लढत पक्षापेक्षा काँग्रेसच्या दोन गटात झाली.[२४]

या निवडणुकीचे आणखी एक ठळक वैशिष्टय म्हणजे शहरी भागातील प्रचार साहित्य आता ग्रामीण खेडयात पोहचले होते. नेत्यांची, उमेदवारांची कट-आऊटस्, मोठाली पोस्टर्स, बॅनर्स यामुळे ग्रामीण भागातील वातावरण बदलून गेले होते. सर्वच पक्षात तरुण मंडळींचा सहभाग यावेळी मोठया प्रमाणात दिसत होता. गाव पातळीवर यशस्वी नेतृत्व करणारे बरेच तरुण सरपंच या निवडणुक रिंगणात होते. काँग्रेसच्या दोन गटात झालेल्या या अत्यंत अटीतटीच्या निवडणुकीचा निकाल खालीलप्रमाणे लागला.

## गडहिंग्लज तालुका जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक - सन १९९२ - निवडणूक निकाल तालिका

### तालिका

| जिल्हा परिषद | पंचायत समिती |
|---|---|
| वैध मतदान - ६५,९५१ | वैध मतदान - ६५,८४७ |
| अवैध मतदान - २,७१३ | अवैध मतदान - २,८३६ |

| अ.नं. | मतदार संघाचे नांव | उमेदवाराचे नाव | पक्षाचे नांव | मिळालेली मते |
|---|---|---|---|---|
| | **जिल्हा परिषद** | | | |
| १) | नेसरी | श्रीमती शोभादेवी शिंदे-नेसरीकर | बंडखोर कॉंग्रेस | ६,९४१ |
| २) | महागाव | ॲड. हणमंतराव पाटील | कॉंग्रेस(आय) | ७,३७३ |
| ३) | कडगाव | सौ.क्रांती किसनराव कुराडे | कॉंग्रेस(आय) | बिनविरोध |
| ४) | हसूरचंपू | श्री.मलगोंडा पाटील | बंडखोर कॉंग्रेस | ७,१०९ |
| ५) | नूल | " भिमाप्पा सरनाईक | कॉंग्रेस(आय) | ६,२१० |
| ६) | हलकर्णी | " राजकुमार हत्तरकी | कॉंग्रेस(आय) | ७,१०६ |
| | **पंचायत समिती** | | | |
| १) | महागाव | श्रीमती माधुरीदेवी देसाई-महागावकर | कॉंग्रेस(आय) | बिनविरोध |
| २) | नेसरी | श्री. कृष्णा रेडेकर | कॉंग्रेस(आय) | ३,१३३ |
| ३) | कडगाव | ॲड. विकास पाटील | बंडखोर कॉंग्रेस | ३,४४१ |
| ४) | कौलगे | श्री. अशोक मोहिते | कॉंग्रेस(आय) | ४,४१० |
| ५) | बसर्गे | सौ. मंगला पाटील | कॉंग्रेस(आय) | बिनविरोध |
| ६) | बटकणंगले | श्री. दीपक भय्यासो जाधव | बंडखोर कॉंग्रेस | २,७१३ |
| ७) | हसूरचंपू | सौ.विद्या चव्हाण | कॉंग्रेस(आय) | ३,८७८ |
| ८) | मुत्नाळ | श्री. आडव्याप्पा कांबळे | अपक्ष | ३,९४३ |
| ९) | नूल | " विनोद नाईकवाडी | जनतादल | ३,४६९ |
| १०) | हलकर्णी | " साताप्पा शेरवी | कॉंग्रेस(आय) | २,७०६ |
| ११) | तेरणी | सौ. सुशीला तेगीनहाळे | जनतादल | ३,२५५ |
| १२) | भडगाव | श्री. शिवाजीराव पाटील - भडगांवकर | कॉंग्रेस(आय) | |

गडहिंग्लज तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीचे निकाल धक्कादायक आणि अनपेक्षित स्वरूपाचे लागले होते. तालुक्याचे ज्येष्ठ नेते नागाप्पाण्णा बटकडली, तालुका जनता दलाचे अध्यक्ष बी.टी.पाटील पराभूत झाले. तर प्रतिष्ठेच्या नेसरी मतदार संघात बाबा कुपेकर यांच्या भावजयी सौ. वंदनादेवी कुपेकर यांचा पराभव करून बंडखोर काँग्रेस उमेदवार श्रीमती शोभादेवी शिंदे-नेसरीकर विजयी झाल्या. हसूरचंपू मतदार-संघात काँग्रेस (आय) चे दत्ताजी नलवडे हे बंडखोर काँग्रेस उमेदवार मलगौंडा पाटील यांच्याकडून पराभूत झाले. तालुका पंचायत समिती निवडणुकीत कुपेकर आणि हत्तरकी गटाला समान जागा मिळाल्या होत्या. त्यामुळे पंचायत समितीमध्ये प्रथमच जनता दलाने २ जागा जिंकून प्रवेश केला होता.[२५]

गडहिंग्लज पंचायत समिती सभापती पदावर श्रीमती माधुरी देसाई-महागांवकर यांची निवड झाली. काँग्रेस(आय) च्या धोरणात्मक निर्णयानुसार काँग्रेस (आय) पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेल्या उमेदवारा-चीच निवड झाली हे वरवरचे चित्र असले तरी या निवडीच्या वेळी गटबाजीचे प्रदर्शन घडलेच होते. पक्षाच्या धोरणाच्या चौकटीत राहून हत्तरकी गटाने अगदी यशस्वीपणे कुपेकर गटावर मात केली होती आणि आपल्या गटाचा उमेदवार सभापतीपदी निवडून आणला. गटबाजीच्या या रस्सीखेचीत पक्षाने अधिकृत म्हणून उभे केलेले शिवाजीराव पाटील भडगावकर मात्र पराभूत झाले. पक्षाने उमेदवार दिला. सर्व सदस्यांना लेखी आदेश देऊन मतदान करण्याचे आवाहन करूनसुध्दा शिवाजीराव पाटील-भडगावकर पराभूत झाले. गटबाजीच्या राजकारणात हत्तरकी गटाने कुपेकर गटास यशस्वी शह दिला होता, हे स्पष्ट होते. पंचायत समिती सभागृहात १० काँग्रेस (आय) चे, ५ बंडखोर काँग्रेस, २ जनता दल, आणि १ अपक्ष असे बलाबल आहे. यातील काँग्रेस (आय) चे ७ आणि बंडखोर एक असे ८ कुपेकर गटाकडे

होते. बाकीचे सर्व १० सदस्य कुपेकर विरोधी आघाडीत सामील झाले होते. या प्रमाणेच मतदान झाले. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत कुपेकर गटाविरोधी हत्तरकी यांच्या नेतृत्वाने एक प्रबळ आघाडी तयार झाली. खरे तर माधुनी देसाई यांचे नाव चर्चेतही नव्हतेच. बंडखोर म्हणून निवडून आलेले अॅड. विकास पाटील यांचे नांव नक्की झाले होते. तथापि पक्षाचा आदेश आल्याने कॉंग्रेस (आय) उमेदवाराची निवड करण्याचे बंधन आणि नेत्यांचा आदेश आल्याने माधुरी देसाई यांच्याशिवाय हत्तरकी गटापुढे पर्यायच नव्हता. त्यामुळेच माधुरी देसाई यांना संधी चालून आली आणि त्या सभापती पदावर विराजमान झाल्या. महागाव मतदार संघातून त्यांचे नाव पुढे आले. आणि बिनविरोध निवडून येण्याची संधी त्यांना मिळाली. या पाठोपाठच दोन गटातील रस्सीखेचीतून थेट सभापतीपदावर पोहोचवण्याची संधी चालू आली. पंचायत समितीच्या इतिहासात एका महिलेला हा प्रथमच मान मिळाला. जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीतील गटबाजीने मांडलेला उच्छाद, त्यापाठोपाठ सभापती निवडीत झालेले गटबाजीचे प्रदर्शन या गोष्टी पाहिल्या, तर खंबीर नेतृत्वाअभावी पक्ष भरकटत चालल्याचे दिसते. हत्तरकी-कुपेकर गटाच्या रस्सीखेचीत तालुक्याच्या विकासाकडे मात्र साफ दुर्लक्ष झालेले आहे. हा कॉंग्रेस (आय) नेतृत्वाचा वाद तालुक्याच्या विकासाला खीळ घालत आहे. हीच गोष्ट जनतेच्या चिंतेचा विषय बनली आहे.[२६] गटातटाच्या राजकारणात कोण किती विकासाची कामे करतो याला नगण्य किंमत असते. याचे उदाहरण या तालुक्याचे देता येईल.

## सन १९९२ च्या गडहिंग्लज पंचायत समिती निवडणुकीचे परिणाम

गडहिंग्लज तालुका जिल्हा परिषदा व पंचायत समिती निवडणुकीने तालुक्याचे संपूर्ण राजकारण ढवळून निघाले. सर्वच नेते मंडळींना जनतेने

मतपेटीच्या कौलाने धडा शिकविला. या निवडणुकीचे खालीलप्रमाणे परिणाम दिसून येतात.

१) या निवडणुकीत जनतेने दिलेल्या कौलाकडे नजर टाकली तर ब-याच नवीन गोष्टी उघड झाल्याचे दिसते. सर्वात ठळक दिसणारी गोष्ट म्हणजे बंडखोरीला मोठी प्रतिष्ठा मिळाल्याचे चित्र इथे दिसते. जिल्हा परिषदेच्या स्थापनेपासून सतत निवडून जाणारे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नागाप्पा बटकडली यांचा पराभव आणि दुस-या बाजूला हसूरचंपू पंचायत समिती महिला राखीव मतदारसंघातून परवापर्यंत मुंबईच्या रहिवासी असलेल्या सौ. विद्या चव्हाण यांचा चांगल्या मतांनी विजय या दोन गोष्टी धक्का देणा-या ठरल्या.

२) ही निवडणूक म्हणजे ज्येष्ठ नेते बाबा कुपेकर विरूद्ध सर्व गट आणि पक्ष असेच चित्र होते. खास करून काँग्रेसचे नेते राजकुमार हत्तरकी यांच्या नेतृत्वानेच कुपेकर विरोधी आघाडी झाली होती. काँग्रेस पक्षाची उमेदवारी मिळविण्यासाठी कुपेकर आणि हत्तरकी यांनी जोरदार प्रयत्न केले. मिळालेली तिकिटे पदरात पाडून घेतली आणि जिथे तिकीट मिळाले नाही, तिथे बंडखोर उमेदवार उभे करण्यात आले. या सूत्रामुळेच अधिकृत आणि बंडखोर समान पातळीवर आले.

३) ज्येष्ठ नेते बाबा कुपेकर यांच्या मतदारसंघात सौ. वंदनादेवी कुपेकर यांच्या विरोधात हत्तरकी गटाने शोभादेवी शिंदेंना जसे प्रोत्साहन दिले, तसेच कुपेकर गटाने राजकुमार हत्तरकी यांच्या विरोधात गुरूलिंग नंजाणावर यांना उभे करून बिनविरोध निवडून येण्याची हत्तरकी यांची संधी हिरावून घेतली. हत्तरकी यांनी हसूरचंपू मतदार संघात मलगोंडा पाटील या अपक्ष

उमेदवारास अशी साथ करून विजयी केले, तसेच बटकणंगले मतदार संघात हत्तरकी गटाचे भैरू पाटील या काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराचा पराभव दीपक जाधव या अपक्षाने केला आणि त्याला बाबा कुपेकरांची साथ होती.

४) जनता दलाने नूल आणि तेरणी या पंचायत समितीच्या दोन जागा जिंकून पंचायत समितीत प्रथमच प्रवेश केला आहे. हे एकीकडे समाधान लाभत असतानाच तालुका जनता दलाचे अध्यक्ष बी.टी. पाटील यांचा पराभव जनता दलास धक्का देऊन गेला. नूल मतदार संघात विनोद नाईकवाडी या जनता दलाच्या उमेदवाराने काँग्रेस उमेदवाराचा पराभव करून बाबा कुपेकरांना धक्का दिला.

५) हे सारे चित्र लक्षात घेतले तर नेते मंडळीतील एकमेकास पाय अडकविण्याची चांगली स्पर्धा पाहायला मिळते. काँग्रेस उमेदवारांबाबत तर अधिकृत कोण ? बंडखोर कोण ? कोण नेता कुणासाठी प्रयत्न करीत होता ? असा सर्व गोंधळ पाहायला मिळतो. इथे हात, तिथे सायकल, पलिकडच्या मतदार संघात चक्र अशी तारेवरची कसरत काँग्रेसची सर्व नेते मंडळी करीत होती.

६) पक्ष शिस्त, पक्ष निष्ठा, तालुक्याचा विकास या सर्व गोष्टी गुंडाळून ठेवून नेते मंडळींनी प्रदर्शन घडविले.

७) या निवडणूकीपूर्वी बाबा कुपेकर यांनी चित्री धरण प्रकल्प मंजुरीच्या निमित्ताने तालुक्यात काँग्रेस पक्षाची एक चांगली हवा निर्माण केली होती. याच वातावरणात गडहिंग्लज पालिका भूविकास बँक, बाजार समिती, साखर कारखाना निवडणूक या एकापाठोपाठ झालेल्या निवडणुका काँग्रेसच्या झेंड्याखाली जिंकून कुपेकरांची दौड सुरु होती. जिल्हा परिषद निवडणुकीच्या

निमित्ताने मात्र कुपेकरांचा वारू रोखायचा, त्यांना एकाकी पाडायचे या एकाच सूत्रावर हत्तरकी गट, जनता दल आणि छोटेमोठे गट एकत्र आले. विधानसभा निवडणुकीप्रमाणेच कुपेकर विरोधी आघाडी तयार झाली आणि आघाडीने कुपेकरांना रोखण्यात यश मिळविले. तालुक्यातील सत्तास्पर्धेचा खेळ असा सुरू होता. या निवडणुकीत दोन्ही आघाड्यांनी संमिश्र यश मिळविले होते. परंतु सभापती. निवडीत मात्र हत्तरकी गटाने कुपेकर गटाला यशस्वी राजकीय शह दिला होता.

८) या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाची अवस्था मात्र शोचनीय झाली होती. गेल्या पंचायत समिती सभागृहात शेकापचे कृष्णराव वाईंगडे एकमेव प्रतिनिधी होते. यावेळी एकही उमेदवार निवडून आला नाही.

९) कॉंग्रेसच्या दोन गटांत यावेळी मोठी चुरस होती. तालुक्याच्या नेतृत्वाचीच लढाई होती. काही मतदारसंघात लाखो रुपयाचा चुराडा झाला. एका उमेदवाराच्या वीस पंचवीस गाड्या मतदारसंघात फिरत होत्या. बाबा कुपेकर विरोधी गटाच्या सौ. क्रांती कुराडे, माधुरी देसाई व मंगला पाटील या तीन महिला उमेदवार बिनविरोध निवडून आल्या. चित्री प्रकल्पाच्या मंजुरीने तालुक्यात कुपेकरांना आशादायक चित्र ? तयार झाले होते, पण निवडणुका जाहीर झाल्यावर चित्री प्रकल्प बाजूला राहिला. कुपेकरविरोधी गटाचे सर्व एकत्र आले होते.

ही निवडणूक म्हणजे या तालुक्याच्या नेतृत्वाची झुंज होती. यात हत्तरकी गटाने बाजी मारली. तालुक्याचा नेता कोण ? नेतृत्व कोणाचे ? या प्रश्नात जनतेला स्वारस्य नाही. सर्वांच्या जिव्हाळ्याचा चित्री प्रकल्प, औद्योगिक वसाहत असे महत्वाचे प्रश्न रखडत पडलेले आहेत. तालुक्याचा

विकास खुंटत आहे. हीच चिंतेची गोष्ट आहे. तालुक्याच्या राजकारणाचे वळण निश्चित होत नसल्याने मोठीच गोंधळाची स्थिती आढळते. नेते मंडळींची नेतृत्वाची लढाई, त्यासाठी चाललेले डावपेच, त्यातून कार्यकर्त्यांचा झालेला गोंधळ आणि भांबावलेली जनता असेच तालुक्याचे चित्र सध्या तरी दिसते. २७

## गडहिंग्लज पंचायत समितीचे विकास कार्य

गडहिंग्लज पंचायत समितीने केंद्र आणि राज्यशासनाच्या विविध योजनांची यशस्वीपणे कार्यवाही केली आहे. गेल्या १० वर्षात कार्यान्वित झालेल्या योजनांमुळे गावोगावी कामाची उभारणी झाल्याचे ठळकपणे पाहायला मिळते. बायोगॅस आणि एकात्मिक ग्रामीण विकास योजना या दोन महत्वाच्या योजनांची १० वर्षापूर्वी कार्यवाही सुरु झाली. तालुक्यात गेल्या दशकात योजनांची कार्यवाही उत्तम प्रकारे झाली आहे. तालुक्यात गेल्या १० वर्षात २८०७ बायोगॅस सयंत्रे बसविण्यात आली आहेत. ती सर्व यशस्वीपणे कार्यरत आहेत. एकात्मिक ग्रामीण विकास योजनांसाठी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची १९८१ साली पाहणी करण्यात आली. त्यामध्ये एकूण ३४,३९४ कुटुंबापैकी वार्षिक ३,५०० पेक्षा कमी उत्पन्न असलेली १५,४१२ कुटुंबे दारिद्र्य रेषेखालील यादीत समाविष्ट करण्यात आली. यापैकी २,२९८ मागासवर्गीय आणि २,१०० महिला प्रधान कुटुंबे आहेत. एकात्मिक योजनांचा लाभ पुढील प्रमाणे देण्यात आला. सन १९८१-८२ साली ५५८ कुटुंबे, १९८२-८३ साली १२४५ कुटुंबे, १९८३-८४ साली १२४५ कुटुंबे, १९८४-८५ साली ४४९ कुटुंबे, १९८५-८६ साली ३७० कुटुंबे, १९८६-८७ साली ६२० कुटुंबे, १९८७-८८ साली ५९० कुटुंबे, १९८८-८९ साली ५८८ कुटुंबे, १९८९-९० साली ११८४ कुटुंबे, १९९०-९१ साली १४६४ कुटुंबे, सन १९९१ साली २०९ कुटुंबे वरीलप्रमाणे ७७७३ कुटुंबाना योजनेचा लाभ देण्यात आला.

दरवर्षी २१ लाख रुपये अनुदान या योजनेसाठी येते. राष्ट्रीयकृत जिल्हा बँक व नाबार्ड यांच्याकडून योजनेला पतपुरवठा होत असतो. दुभती जनावरे, शेळ्या, मेंढया, विहीर दुरुस्ती, छोटे उद्योग यासाठी मदत देण्यात येते. ट्रायसेम योजनेची कार्यवाही चांगली झाली आहे. १८ ते ३५ वयोगटातील दारिद्र्य रेषेखालील ५७४ उमेदवारांना गेल्या १० वर्षात प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण केलेल्यांना उद्योगासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यात आले, तर काहींना रोजंदारी मिळवून देण्यात आली. या योजनेतील महिलांनादेवदासी पुनर्वसन केंद्रामार्फत घडयाळ जुळणीचे प्रशिक्षण देण्यात येते.

गावच्या विकासासाठी जवाहर रोजगार योजना वरदान ठरली आहे. या योजनेतून रस्ते, गटारी, पिण्याचे पाणी, पंचायत इमारती अशी कामे उभी राहिली आहेत. तालुक्यात ८९ पंचायती आहेत. लोकसंख्येच्या प्रमाणात २७ लाख रुपये अनुदान मिळते. इंदिरा विकास आवास योजनेखाली अनेक गावात घरकुले बांधून देण्यात आली आहेत. [२८] याशिवाय सुधारित चुली, जवाहर रोजगार योजना, जीवनधारा-जवाहर विहीर बांधकाम, महिला बालकल्याण विकास कार्यक्रम, हरिजन वस्ती सुधार योजना आदि कामे प्रगतिपथावर आहेत. पल्स पोलिओ लसीकरण मोहीम गडहिंग्लजसह ९१ गावात राबविण्यात आले. साक्षरता अभियान मोहिमही गतिशील आहे. वीस कलमी कार्यक्रम व विविध विकास कार्यक्रम राबविण्यात पंचायत समिती गडहिंग्लज जिल्ह्यात अग्रेसर आहे. [२९]

केंद्र आणि राज्यशासनाकडून येणाऱ्या विविध विकास योजनांची गावपातळीपर्यंत कार्यवाही करण्याची जबाबदारी प्रामुख्याने तालुका पंचायत समित्यांवर आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई, तालुक्यातील रस्त्यांचा

प्रश्न, पंचायत समितीमार्फत हाताळला जातो. एवढी महत्वाची संस्था असलेल्या पंचायत समितीच्या कारभारात मात्र आदी साचेबंदपणा आला आहे. पंचायत समितीची दरमहा बैठक होते. विविध विषयावर ठराव केले जातात, मात्र त्याचे पुढे काय होते, समजत नाही. ते जाणून घेण्याचा गांभीर्याने प्रयत्नही कुणी करीत नाही. दरमहाची बैठक, साचेबंदपणाने काढलेली विषयपत्रिका, त्या अनुक्रमाने विषयवार चर्चा, खातेनिहाय आढावा सांगणारी अधिका-यांची टिपणी तीच आकडेवारी, तीच तपशील तेच प्रश्न, तीच उत्तरे असा साचेबंदपणा आला आहे. केवळ उपचार म्हणूनच बैठका होतात काय ? असा प्रश्न पडावा अशी स्थिती आहे.

जिल्हा परिषदेचे सर्व सदस्य या सभागृहाचे सन्माननीय सदस्य आहेत. परंतु जिल्हा परिषदेच्या तुलनेत या तालुका पंचायत सभागृहात यायला त्यांना कमीपणा वाटतो की काय, समजत नाही. काही अपवाद वगळता बहुसंख्य सदस्य गैरहजर असतात. ज्येष्ठ नेते राजकुमार हत्तरकी, शोभादेवी शिंदे-नेसरीकर, हणमंतराव पाटील अशी काही नावे सांगता येतील. सहा महिन्यांतून एखाद्या बैठकीलाच ही मंडळी हजर असतात. खरे तर इथले ठराव, निर्णय यांची नोंद घेऊन जिल्हा स्तरावर पाठपुरावा आवश्यक असतो परंतु तसे घडत नाही. [30]

## पंचायत समितीची तालुका राजकारणात भूमिका आणि परिणाम

पंचायत राज्याचे एक मुख्य उद्दिष्ट ग्रामीण समाजात स्थानिक नेतृत्व निर्माण करणे आणि विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याबाबतची जबाबदारी स्वीकारावयास त्या नेतृत्वाला सक्षम बनविणे हे होते. त्याकरिता पंचायत राज्याने ग्रामीण नेतृत्वावर अनेकविध कामांची जबाबदारी सोपवून

त्याच्या विकासास मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे. पंचायत राज्यामुळे ग्रामीण भागात नव्या नेतृत्वाचा निश्चितच उदय झाला आहे. या नव्या नेतृत्वास आपल्या सामर्थ्याची जाणीव झाली आहे. त्याने ग्रामीण भागाच्या राजकारणावर आपली जबरदस्त पकड बसविली आहे. पंचायत राज्यांतर्गत स्थापन झालेल्या ग्रामपंचायती, पंचायती समिती, जिल्हा परिषदा या संस्थामधील सत्तास्थाने नव्या नेतृत्वाने समर्थपणे सांभाळली आहेत. इतकेच नव्हेतर या सत्तास्थानांचा उपयोग आपले हितसंबंध सांभाळण्यासाठी कसा करून घ्यावयाचा याचे धडेही त्याने चांगल्या प्रकारे गिरविले आहेत. सत्तास्थाने काबीज करणे आणि ग्रामीण समाजावर आपले वर्चस्व प्रस्थापित करणे यावर भर दिला जात आहे. सत्ता हे लोकसेवेचे साधन मानण्याऐवजी ते सामाजिक व राजकीय प्रतिष्ठेचे लक्षण मानले आहे.[३१] सर्वसामान्य माणसाला राजकीयदृष्टीने शिक्षित करण्यात पंचायत समितीने बरीच प्रगती केली आहे. ग्रामपंचायतीची निवडणूक, पंचायत समितीची निवडणूक, जिल्हा परिषदेची निवडणूक, मार्केट कमिटीची निवडणूक, सहकारी संस्थांच्या निवडणूका यामुळे सामान्य माणूस आता राजकीय बनू लागला आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण नेतृत्व झपाट्याने उदयास येऊ लागले आहे. पंचायत समितीच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींचा राज्यकारभारातील सहभाग वाढविण्यातही यश मिळविले आहे.

आतापर्यंत खालील व्यक्तींनी गडहिंग्लज पंचायत समिती सभापतीपद भूषविले आहे.

| अ.नं. | सभापतीचे नाव | कार्यकालावधी |
|---|---|---|
| १) | श्री. शिवगोंडा आप्पासो पाटील | १९६२ ते १९६४ |
| २) | " अनंत मुकुंद तेलवेकर | १९६४ ते १९६७ |
| ३) | " सातगोंडा रूद्रगोंडा पाटील | १९६७ ते १२ मे, १९७७ |
| ४) | " राजकुमार शंकरराव हत्तरकी | १ जून, १९७७ ते १३ जून, १९७९ |
| ५) | " बाबासाहेब आ. पाटील | १४ जून, १९७९ ते १० जाने., ८२ |
| ६) | " आप्पासाहेब भि. पाटील | २० जाने., ८२ ते ३० जून, ९० |
| ७) | श्रीमती माधुरीदेवी देसाई-महागांवकर | १४ मार्च, ९२ ते -- |

गडहिंग्लज तालुका पंचायत समितीतून जे नवे नेतृत्व निर्माण झाले ते सत्तेच्या राजकारणात गुरफटलेले दिसते. सत्तास्थाने मिळविणे, आपला राजकारणातील प्रभाव वाढविणे, ग्रामपातळीवरून पंचायत समिती पातळी गाठणे, त्यानंतर जिल्हा पातळीवर नेतृत्व उभे करणे व हळूहळू राज्यपातळी व राष्ट्रपातळीचा विचार करणे अशी प्रक्रिया वाढीस लागलेली दिसते. पक्षीय राजकारणाचा प्रभाव पंचायत समिती पातळीवर वाढत आहे. खेडेपातळीवर सरपंच, पंचायत सदस्य, पोलीस पाटील, जमीनदार, श्रीमंत हे तेथील श्रेष्ठीजन ठरतात. ते वेगवेगळया पध्दतीने आपला प्रभाव वाढवितात. या प्रभावाच्या वेगवेगळया आधारेच तालुका पातळीवर पोहचण्याचा प्रयत्न करतात. गटाचे राजकारण, जातीचे राजकारण करताना एका क्षेत्रातील नेते दुसऱ्या क्षेत्रातील नेत्यांना मदत करतात किंवा विरोध करताना दिसतात. पंचायत राज्य व्यवस्थेमध्ये पंचायत समितीचे स्थान महत्वाचे आहे. पंचायत समितीच्या मदतीने तालुका राजकारणावर प्रभाव निर्माण करता येतो. गडहिंग्लज तालुका पंचायत समितीच्या माध्यमातून राजकुमार हत्तरकी, बाबा कुपेकर, हणमंतराव पाटील, नागाप्पाण्णा बटकडली यांच्या सारख्या नेत्यांनी तालुका आणि जिल्हा राजकारणावर आपली पकड निर्माण केलेली दिसते. तालुक्यातील साखर कारखाना, नगरपालिका व पंचायत समिती या संस्थांवर त्याचा प्रभाव आहे. नागाप्पाण्णा बटकडली हे साखर कारखान्याचे संचालक होते. सन १९७८ साली बटकडलींनी विधानसभेची निवडणूकही रेड्डी कॉंग्रेसमार्फत लढविली होती. तसेच सन १९६२ पासून तीस वर्षे त्यांनी जिल्हा परिषद सदस्य होते. दत्ताजीराव कदम सूत गिरणी, पंचायत समिती उपसभापती, मार्केट कमिटी, शिवाजी बँक संस्थापक, जिल्हा नियोजन मंडळ अशा विविध ठिकाणी काम केले होते. राजकुमार हत्तरकी यांनी पंचायती समिती सभापती म्हणून आणि जिल्हा परिषदेत अर्थ व शिक्षण खात्याची धुरा त्यांनी यशस्वीपणे सांभाळली होती.

डिसेंबर, ९५ मध्ये त्यांची जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. अॅड. श्रीमंतराव पाटील यांनी गडहिंग्लज साखर कारखाना उपाध्यक्ष म्हणून काम केले आहे. बाबा कुपेकर यांनी कृषी खात्याचे सभापती म्हणून पाच वर्षे आणि त्यानंतर विरोधी पक्षनेते म्हणून आणखी पाच वर्षे काम पाहिले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) पक्षाचे सरचिटणीस म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. गडहिंग्लज तालुका पंचायत समितीच्या माध्य-मातून त्यांनी नगरपालिका, साखर कारखाना पंचायत समिती यावर वर्चस्व निर्माण केले आहे. नगरपालिका, साखर कारखान्यामध्ये सत्तांतर घडवून आणण्यात कुपेकरांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. मार्च, १९९५ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणूकीतही त्यांनी विजय मिळविला. अशाप्रकारे तालुका पंचायत समितीचे स्थान तालुका राजकारणात महत्वपूर्ण आहे. तालुका पंचायत समितीच्या माध्यमातून जिल्हा, राज्यपातळीवर प्रभाव निर्माण करता येतो.

गडहिंग्लज तालुका पंचायत समितीच्या राजकारणावर तालुक्याच्या आणि साखर कारखान्याच्या राजकारणाचा मोठाच प्रभाव पडलेला आप-ल्याला दिसून येतो. कारण पंचायत समिती हा सुध्दा स्थानिक राजकारणाचा एक आखाडा आहे. सुरवातीच्या काळामध्ये जास्त गटबाजीच्या राजकारणाचा मोठा प्रभाव नव्हता. परंतु नंतरच्या काळामध्ये त्यातही गटबाजीचे राजकारण मोठ्या प्रमाणामध्ये घुसले. १९८० नंतर तालुक्यामध्ये अनेक गट निर्माण झाले. पण काँग्रेस अंतर्गत राजकुमार हत्तरकी यांचा गट पंचायत समिती राजकारणा-मध्ये जास्त प्रभावी दिसतो. किंबहुना आपणास असेही म्हणता येईल हत्तरकी यांच्या राजकीय जीवनाची जडणघडणच पंचायत समिती राजकारणात झाली.

.....

प्रकरण पाचवे

## संदर्भसूची


१) चुनखडे ना.ए.आणि - ग्रामीण समाजशास्त्र,
पाटील वि.भ. - फडके प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती, १९९०,
पृष्ठ नं. १२३, १२४.

२) तत्रैव, पृष्ठ नं. १२४, १२५.

३) तत्रैव, पृष्ठ क्रं. १२५ ते १२८.

४) पाटील पी.बी. - पंचायत राज्य, जिल्हा नियोजन आणि
(संपादक) ग्रामीण विकास - परिसंवाद,
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई,
प्रथम आवृत्ती, १९८९,

५) तत्रैव, पृष्ठ नं. ८५.

६) अवचट श्रीवल्लभ दत्तात्रेय- पंचायत राज्याचा कारभार म्हणजे शासनाचे
विकेंद्रीकरण, ग्रामशिक्षण साहित्य प्रकाशन,
पुणे, प्रकाशन - १९६२, पृष्ठ नं. ५१, ५२.

७) दैनिक पुढारी, कोल्हापूर दि. ४ ऑगस्ट, १९६२.

८) तत्रैव, दि. ३ ऑगस्ट, १९६७

९) तत्रैव, दि. ३ ऑगस्ट, १९७२

१०) तत्रैव, दि. १४ मे, १९७९.

११) तत्रैव, दि. १९ मे, १९७९.

१२) तत्रैव, दि. २६ मे, १९७९.

१३) तत्रैव, दि. २५ व २६ मे, १९७९.

१४) तत्रैव, दि. ३१ मे, १९७९.

१५) दैनिक सकाळ, कोल्हापूर - दि. ३० जून, १९९० व
दि. ११ फेब्रुवारी, १९९२.
१६) तत्रैव, दि. २६ नोव्हेंबर, १९८७.
१७) तत्रैव, दि. ९ मे, १९८८.
१८) तत्रैव, दि. ६ ऑगस्ट, १९९०.
१९) तत्रैव, दि. ऑक्टोबर, १९८७.
२०) तत्रैव, दि. २६ नोव्हेंबर, १९८७.
२१) तत्रैव, दि. २२ ऑक्टोबर, १९९१.
२२) तत्रैव, दि. १५ फेब्रुवारी, १९९२.
२३) तत्रैव, दि. २३ फेब्रुवारी, १९९२.
२४) दैनिक पुढारी, कोल्हापूर दि. २३ फेब्रुवारी, १९९२.
२५) दैनिक सकाळ, कोल्हापूर दि. २७ फेब्रुवारी, १९९२.
२६) तत्रैव, दि. २० मार्च, १९६२.
२७) तत्रैव, दि. १ मार्च, १९९२.
२८) तत्रैव, दि. फेब्रुवारी, १९९२.
२९) दैनिक केसरी, सांगली, दि. ४ डिसेंबर, १९९५.
३०) दैनिक सकाळ, कोल्हापूर दि. ३० ऑक्टोबर, १९९५.
३१) चुनखडे ना.ए. आणि पाटील वि.भ. - तत्रैव, पृष्ठ नं. १३०, १३१.

......